

# मन अंजुषी

डॉ.अंजुषा अनिल पाटील

# मन अंजुषी


## डॉ. अंजुषा अनिल पाटील



ई साहित्य प्रतिष्ठान

# मन अंजुषी (ललित)


## लेखक: डॉ.अंजुषा अनिल पाटील

पूर्ण पत्ता- A/302 मिताली सोसायटी, सिद्धेश्वर तलावासमोर, पाटील वाडी, ठाणे (पश्चिम )

ई-मेल -anjushapatil123456@ gmail. Com.

फोन नंबर : +91 9867678836



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

# ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे
www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

## प्रकाशन : २० एप्रिल २०२५

©esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखक परिचय



## डॉ.अंजुषा अनिल पाटील

## M. A. Bed, phd

सेवानिवृत्त मुख्याध्यापिका, मुलाखतकार, समुपदेशक , लेखिका.

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागात 38 वर्षे, आधी शिक्षिका नंतर मुख्याध्यापिका, केंद्रप्रमुख , गटप्रमुख म्हणून सर्विस केली आहे.

"The Mentel Health Helth of Child " या विषयात पीएचडी मिळवली आहे.

लहानपणापासून वाचनाची प्रचंड आवड.

सुधा मूर्ती, सानिया, शांता शेळके, दुर्गा. भागवत, डॉ. विजया वाड, व. पु. काळे, पु. ल., शैलजा राजे, शिवाजी सावंत, व. पू. पू. ल, अशा अनेक नामवंत लेखकांची शेकडो पुस्तक वाचली आहेत. 100 पुस्तकांची परीक्षण लिहिली आहेत.

शिक्षकी पेशा असल्यामुळे वक्तृत्व स्पर्धा, परिसंवाद, निबंध स्पर्धा, उस्फूर्त फेरी अशा उपक्रमामध्ये अनेक पारितोषिके मिळाली.

वेगवेगळ्या वर्तमानपत्रात लेख लिहिले.

प्रकाशित साहित्य-

"लिहिता लिहिता " शारदा प्रकाशन

गुजमनीचे व्यास क्रिएशन ( स्फूटलेखन )

ओंजळ ( कवितासंग्रह ) व्यास क्रिएशन

मनाच्या गंधकोषी ( प्रबंध पर लेखन) कोठावळे प्रकाशन

पुस्तकांच्या अंतरंगी

चाकोरीतून बाहेर पडताना ( सृजन संवाद प्रकाशन )

पुरस्कार

*ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग " आदर्श शिक्षक पुरस्कार" प्राप्त.

* स्वातंत्र्य सैनिक सेवा समिती राज्यस्तरीय शोधनिबंधास " साहित्यरत्न पुरस्कार ", गुणवंत पुरस्कार, आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार अशा

वेगवेगळ्या संस्थाचे 41 पुरस्कारांने सन्मानित.

अभिनय कट्टा नौपाडा ठाणे

यांच्यातर्फे किरण नाकती यांच्या हस्ते 5 सप्टेंबर 2023 चा " आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार " मिळाला आहे.

सर्वद फाउंडेशन मुंबई संस्थेचा राज्यस्तरीय स्टार साहित्यिक पुरस्कार 2024 प्राप्त.

अनेक वक्तृत्व व निबंध स्पर्धेमध्ये प्रथम पुरस्कार प्राप्त.

विशेष कार्य * विद्यार्थी,पालक,शिक्षक यांना "सुजाण पालकत्व" आणि "मानसिक आरोग्य" या विषयावर समुपदेशक म्हणून कार्यरत.

* वेगवेगळ्या संस्थांमध्ये करिअर मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, मूल्यशिक्षण, संस्कार आणि संस्कृती अशा विविध विषयांवर व्याख्याने देते.

पुस्तक परीक्षण करणे आणि इच्छुक लेखकांच्या पुस्तकाला प्रस्तावना देणे सुरू आहे. कविता गझल कार्यशाळा आयोजन करणे, व्यक्तिमत्व विकास

कार्यशाळा, विद्यार्थी व पालकांचे समुपदेशन स्वतः करतात. निवेदन,सूत्रसंचालन यासारख्या कार्यशाळाचे आयोजन करतात.

कोकण मराठी साहित्य परिषद संस्थेतर्फे 2023 मॉरिशस या देशात जाऊन " मराठी भाषा संवर्धनासाठी" कार्य केले आहे.

वेगवेगळ्या संस्थांकडून उद्घाटक , अध्यक्ष, परीक्षक म्हणून निमंत्रित.

उपक्रम - सेवा जेष्ठ शिक्षक मुख्याध्यापकांचा ग्रुप काढून वेगवेगळ्या उपक्रम घेणे, शिक्षक मुख्याध्यापकांसाठी कार्यशाळा आयोजित करणे, व्याख्यान, समुपदेशन, करियर मार्गदर्शन, सहलींचे आयोजन करणे इ.कार्यक्रम समाजसेवा म्हणून सुरु आहेत.

कालिदास प्रतिष्ठान, मुंबई ठाणे विभाग - सचिव म्हणून कार्यरत.

को. म. सा. प. कार्यकारिणी सदस्य.

आम्ही सिद्ध लेखिका, कार्यकारणी सदस्य.

सर्वद फाउंडेशन ठाणे जिल्हा अध्यक्ष.

व्यास क्रिएशन तर्फे " ज्येष्ठ रत्न पुरस्कार "2024 प्राप्त.

लेखन- ठाणे वार्ता , जीवनदीप वार्ता, वृत्तपकाश आणि सामना वर्तमानपत्रात लेख प्रकाशित होत आहेत.

इतर आवड व छंद - लेखन,संशोधन, संकलन, गायन, समाजसेवा, मुलाखती घेणे, मुलाखती देणे, व्याख्याने आणि समुपदेशन..

# लेखिकेचे मनोगत

आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे सूक्ष्म अवलोकन करून प्रत्येक विषय टीप कागदाप्रमाणे शोषून घेऊन आपल्या कल्पनाशक्तीला आणि प्रतिभेला स्मरून लेखन करण्याची मला सवय झाली आहे. लहानपणापासून ते आज पर्यंत समोर घडलेल्या घटनांची आपल्या बुद्धीने नोंद घेतलेली असते. त्या प्रसंगाचे निरीक्षण आणि त्यावर विचार करून भाष्य करताना काही लेख थेट माझ्या लेखणीतून अवतरले. काही व्हाट्सअप च्या माध्यमातून तर काही सुप्रसिद्ध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाले.

वाचक, रसिक मित्र-मैत्रिणींनी सोशल मीडियावर व काहींनी प्रत्यक्ष भेटून उस्फूर्त सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या. असे अनेक लेख प्रसिद्ध झाल्यावर अजून आपण काहीतरी लिहावं असं वाटू लागलं. आणि आजूबाजूला घडणाऱ्या घटना, पाहिलेल्या व्यक्ती, दैनंदिन जीवनातील अनुभव, सण, उत्सव, दिनविशेष, मराठी भाषा अशा वेगवेगळ्या विषयांवर लेख लिहिले. आणि मन अंजुषी या पुस्तकाची निर्मिती झाली.

चहा खारी हा लहानपणापासून जिव्हाळ्याचा विषय, चीड कसली येते ?, दिवाळीनंतरची हुरहुर, मराठी भाषेला अभिजात दर्जा, मनापासून दिलेली दाद, कंटाळा, 1 अंक या विषयावरचे लेख सर्वांच्या मनातले प्रातिनिधिक विषय आहेत म्हणून ते सर्वांनाच आपलेसे वाटतात.

हे लेख आपल्या आठवणींना आणि स्मरणशक्तीला नक्कीच उजळा देतील असे मला वाटते.

**डॉ. अंजुषा अनिल पाटील**

# अर्पण पत्रिका

**माझ्या लेखनाला प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या सर्व मित्र-मैत्रिणींना हा ललित लेखसंग्रह अर्पण करीत आहे.**

**अंजुषा पाटील**

**शब्द शब्द मांडत गेले**
**व्यथा मनाच्या संपून गेल्या**
**हातातल्या लेखणीने माझ्या**
**शब्दकळा सुगंधित केल्या...**

**अंजुषा पाटील**

# अनुक्रमणिका


१ . चहा खारी

२. अनुभूती गौरी (माता) पूजनाची

३. चीड कसली येते ?

४. पूजासाहित्याचे महत्त्व

५. पंचामृतांचही महत्त्व

६. स्वच्छता ही सेवा

७. मराठी भाषेला अभिजात दर्जा

८. मन करा मोठ

९. द्रुष्टीकोन

१०. दिवाळी नंतरची हुरहुर

११. मनापासून दिलेली दाद

१२. ऋणानुबंध

१३. शोध

१४. १४ नोव्हेंबर बालदिन

१५. संगीत

१६. किल्ली

१७. वेषभूषा आणि स्वतःचा कम्फर्ट

१८. माझी बोली माझी कथा

१९. जागातिक कलादिन

२०. कंटाळा

२१. लहानपण देगा देवा

२२. प्रार्थना

२३. परिवर्तन

२४. १ हा अंक आपल्या सर्वांना आवडतो

२५. पर्यावरणस्नेही

२६. लेखन

# चहा खारी

एक मोठी अल्युमिनिअम ची पेटी डोक्यावर घेऊन भैय्या दररोज खारीss... बिस्किटss... अशी आरोळी देत सकाळीच येत असे.

लहानपणी मोठा टोप आई चहाचा करुन ठेवी. खारी वाल्याकडून लाल लाल कडक अनेक पदर असलेली गोंडस खारी निवडून ती चहाच्या कपात बुड्वून खाण्यात जी मजा होती ना कशातच नाही.

लहानपणी दररोज चहा आणि त्यात काहीतरी खायला मिळत असे. तसेच त्या भैय्या कडे टोस्ट, नानकटाई आणि बटर असायची. जीरा बटर, साधी बटर सुद्धा असायची. पण खारी खाण्यात जी मज्जा होते ना ती अहाहाsss स्वर्गसुख.

चहात खारी बुडवली की ती लगेच नरम पडते पण तुटत नाही. ती चिवट असल्यामुळे कपातच किंवा कपाच्या वरच्या भागावर आपल्याला झुलवत असते. अशी घेउन लगेच तोंडात टाकण्याची घाई असायाची पण गरम चहा मुळे लगेच हात भाजतो. चमच्याने खाण्याची मज्जाच नाही. बोटाने ती खारी ताबडतोप तोंडात. असा हा लपंडाव सकाळी सकाळी चालायचा. खारी कपातून उचलली तर हात भाजे मग तोंडात घातली तर जीभ पोळत असे तरीही फुंकर मारून ती खारी पटकन खाल्ली जायची. बरं घरोघरी हेच प्रकार असत. शिवाय त्या भैय्याची वाट सगळे पाहत असत.

आमचं मोठं किराणा मालाच दुकान असल्यामुळे दुकानात पारलेजी, साधे बिस्किटस छोटी छोटी माकड, बदक चिमणी कावळा यांच्या आकाराची बिस्किटस असायाची. पण ते सर्व पदार्थ संध्याकाळच्या चहाबरोबर चालत असत. तोपर्यंत आमच्या गावात लहाणपणी ब्रिटानिआ ब्रेड पोहोचला नव्हता. आणि आणला तरी

चहा आणि खारीची जी चव जिभेवर होती त्यापुढे सगळे पदार्थ फिक्के. चहा जातो संपून हळूच आईला सांगयच चहा आहे का ग आई? आई लगेच गरम गरम गॅसवर ठेवलेला चहा देत असे. आईच प्रेम आणि तिच्या हातचा तो वात्सल्य, प्रेम आणि ममतेने भरलेला अमृताची चव असलेला चहा.......... अहाहा ? ते वर्णन शब्दातिल आहे.

आज अनेक चहाचे प्रकार आहेत. आमच्या ठाण्याच्या घोडबंदर रोडवर एका चहाच्या उपहारगृहात मी ५० प्रकारचे चहा पाहिले. आश्चर्याचा धक्काच बसला. माझ्या मुलाने चहाची ऑर्डर दिली. दालचिनी वेलची आणि काय काय घातलेला चहा रात्री आम्ही भरपूर पैसे देउन प्यायलो पण लहाणपणी चहात स्टीलच्या पेल्यात खारी बुडवून उरलेला चहा पिण्यात जे स्वर्गसुख होत ना ते कशातच नाही असा हा चहा आणि तशी ती खारी.

आज खारीचेही खूप प्रकार निघाले आहेत. मस्का खारी, लेयरवाली, बेक केलेली खारी, असे अनेक खारींचे प्रक्रार आपल्याला दुकानात , मोलमध्ये खुणावत असतात. पण भैय्याच्या पेटीतील खारीच्या चवीला आजही कोणी आव्हान देऊ शकत नाही याबाबत सर्वांच एकमत नक्कीच होईल.

टोस्ट, बटर, जीरा बटर, बिस्किट, नानकटाई ही सर्व खारीचीच भावंड. पण खारी ती खारीच. अहाहा वर मैद्याच लेयर, ते पण तपकीरी रंगावर भाजलेल त्यामुळे चव अफाट!

आजही चहाच्या टपरीवर काचेच्या पारदर्शक बरणीतून खारी दिसते. खारी तिचा आब आजही राखून आहे. तिला पाहून अनेकांना आपल बालपण आठवत असते.

संगणक युग आल अनेक बाबतीत क्रांती झाली तरी ही खारी आपल्याला अजूनही दिसते आणि चहा व खारी ची ती आठवण कधी हसू तर कधी डोळयात आसू आणते.

त्यावेळी लहान मुलांनी चहा पिण्यावर कसलीही बंदी नव्हती. घरात आमच्या भरपूर दूध दुभत होतं. आमचे वडील स्वत: म्हशीच दूध काढत असत. वडिलांना आई धारोष्ण दूध प्यायला देत असे. आम्हा मुलांना रात्री एक कप दूध सक्तीने प्याव लागे. दूध, दही, ताक, लोणी आणि घरच कढवलेले रवाळ असे साजूक तूप ......... काय ते दिवस होते.

आज जग भौतिक साधन संपत्तीने समृध्द झाल. फॅशन, पैसा, वस्तू, कपडे, खाण्यापिण्याची रेलचेल आणि प्रत्येकाच्या हातात मोबाइलआला आहे. तशी लहानपणी जी अनेक पदार्थ आणि पेय याची जी चव होती ती आता सहसा चाखायला मिळत नाही हे मात्र खर.

## अनुभूती गौरी पूजनाची

रुणझुणत्या पाखरा, जा रे माझ्या माहेरा
आली गौराई अंगणी, तिला लिंबलोण करा

माझं माहेर सावली, उभी दारात माऊली
तिच्या काळजात बाई, माया-ममतेचा झरा

मला माहेरी पाठवा, मला माऊली भेटवा
माझ्या आईच्या पंखात, मला मिळू दे उबारा

गौरी गणपतीमुळे सर्व वातावरण प्रसन्न आणि सात्त्विक झाल आहे. दरवर्षी भाद्रपद शुद्ध सप्तमीच्या आपण गौरी आवाहन ‘ आवाहन न जानाभि’ करतो. प्रत्यक्ष देवीमाता आपल्या घरी माहेरी आलेली असते. तीच माहेरपण करण्यात प्रत्येक स्त्री स्वतःला धन्य समजत असते.

प्रत्यक्ष पर्वती मातेचे लाड गोडधोड, पंचपक्वान, फळ, फुल पानं सर्वांगसुंदर साजश्रुंगार करता करता प्रत्येक स्त्री ला आपल माहेर आठवते. एका डोळयात आसू आणि दूसऱ्या डोळयात हासू अश्या मन:स्थितीत तिला आपली आई आठवते. त्या माऊलीचा तिला भेटण्यासाठी आतूर झालेली आहे. त्या आर्त भावनेत घरी लक्ष्मीच्या पावलानी आलेल्या त्या देवीच माहेरपण, तिच पूजन, भजन, औक्षण,

आरती आणि पंचपक्वानाचा स्वादीष्ट नेवैद्य अर्पण करुन ती माऊली धन्य होते. आपल्या माऊलीला त्याच प्रतिमेत पाहून सुखावते. व आपला प्रपंच सुखाचा व्हावा यासाठी गौरी मातेला प्रार्थना करते. स्वतःसाठी ती काहीच मागत नाही.

पतीच आरोग्य, मुलांच शिक्षण, नोकरी, लग्न आणि मुलंबाळं सुखात ठेव हेच मागण ती माऊली प्रत्यक्ष जगमाऊली कडे मागत असते ?

काय हवं असतं स्त्रीला? कितीही वैभव असलं तरी माहेरी जायचं, माऊलीला सासरी त्या डोळ्यांनाही पाहण्यासाठी, पित्याच्या प्रेमाला भूकेलेलीच असते .

नाच ग घूमा? जेष्ठ्या

कशी मी नाचू ?

ह्या गावचा त्या गावचा, सोनार नाही आला जोडवी न्हाई मला, कशी मी नाचू?

सोनपावलानी घरी आलेल्या सोनपावलानी आलेल्या गौराइचा सगळ करण्याचा आनंद असला तरी माहेरची आठवण येते. संसार सोडून माहेरी ही जाउ शकत नाही. द्विधा मन:स्थिती अंबिका, लक्ष्मी, जगदेश्वरीला या दोन डोळ्यांच्या ज्योतीने प्रत्येक घरची महीला औक्षण करते. डोळ्यात आनंदाश्रू तरळतात. माहेरी येणर्या या जेष्ठ्या आणि कनिष्ठा या सोन पावलानी आल्यात. त्याच माहेरपण घरोघरी वेगवेगळ्या पद्धतीने केले जाते. भक्तीभाव, प्रेम, वास्तल्य या पवित्र भावनेने या गौराई मातेच पूजन साग्रसंगीत पद्धतीने करतात.

कोकणात तेरड्यांच्या फुलांची गौरी तर काही ठिकाणी खड्यांची गौरी, काही ठिकाणी गणपती सारखी पार्थीव मूर्ती आणून सार्वजनिक गौरी उत्सव तर अनेक ठिकाणी मुखवटा सजवून गौरी मातेला जेष्ठ्या आणि कमिष्ठा यांना सुंदर पारंपरिक

पद्धतीने साडी नेसून संपूर्ण दागिन्यानी देविला भक्तीभावाने सजवतात. तेरड्याच्या फूलासकट रोपटी, रानफूल, पाच प्रकारची फल, प्रसन्न वातावरण, फुलाचा सुगंध, अत्तर, कापूर यांचा सुगंध दरवळत असतो. माहेरवाशिणी घरी येतात. अबालवृद्ध एकमेकांना मोठ्या प्रेमाने भेटतात. सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके। शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते॥गौरी मातेला प्रार्थना करताना आज आपल्या मुलींना, महिलांना, लहान मुलांना सुरक्षित ठेव अशी मागणी करतात. समाजातील विकृती नष्ट होऊन सगळीकडे आनंदी आनंद भरु दे. कोकणात काही ठिकाणी सांग्रसंगीत भोजनात पुरणपोळी, घावन, घाटल, पालघर जिल्ह्यात उकडीचे मोदक आणि वालाचे मुटके हे विशेष असते. गोड नेवैद्याचि खूप रेलचेल असते.

प्रत्येक माऊलीला घरी बोलवून तीला हळदी कुंकू लावून तीला गौरी समजून तीच्याशी सौजन्यपुर्ण संवाद साधला जातो.

मुलं लहान असेपर्यंत मी सतत दरवर्षी गौरी उत्सवासाठी माहेरी जात असे. मोठ्या आतुरतेने आई माझी वाट पाहत असे. माझ्या आवडीचे पदार्थ बनवून मोठ्या कौतुकाने वाढत असे. गणपतीची सुट्टी संपेपर्यंत मुलांबरोबर माझेही लाड होत होते. काही काळाने माझ्याकडे गौरीचे आगमन पूजन होऊ लागल. मूल मोठी झाली. आज माझ्याकडे गौराई आली आहे. तिचे लाड आणि गोडधोडाच पाहुणचार करणं ही माझी जबाबदारी आणि आवडीची गोष्ट आहे.

सोनपावलाने काल म्हणजेआदल्या दिवशी गौरी माऊली माझ्या घरी विराजमान झाली आहे. तिचे आगमन, पूजन, भजन, गोडधोड नेवैद्ध अर्पण केल आणि गौरी मध्ये गौर बाई नंतर आम्ही जेवतो तो मंगळागौर महाप्रसाद अमृतासमान

स्वादिष्ट लागला. म्हणजेच नक्की माझी गौराई माझ्यावर प्रसन्न झाली. तीला अर्पण केलेला प्रसाद तिने मोठ्या मनाने या माऊलीने ग्रहण केल्याची मला प्रचीती आली

हे गौरीमाई तुझ्या सोन पावलानी आलीस तशीच घरात सुखसमृद्धी आणि भरभराट करून तूही अशीच भरून रहा अशी आम्ही प्रार्थना केली.

गौरी माता जरी संपूर्ण जगाची माता असली तरी काल मीच तिची माता झाली होती आणि ती माझी कन्या अशी अनुभूती आली. अशी माहेरवाशिण दोन/चार दिवसांसाठी येते आणि जेव्हा सासरी जायला निघते तेव्हा डोळे भरतात तसे माझेही भरले आहेत. पाणवठ्यावर दुसऱ्या दिवशी गौरी विसर्जन करण्याची पद्धत होती. पुढल्या वर्षी लवकर ये असं म्हणून जड पावलानी व भरल्या डोळ्यांनी गौरी मातेला निरोप दिला जातो.

# चीड कसली येते ?

चीड येते पण काय करणार?

काल बेडवर एक मुंगी होती ती नेमकी मलाच चावते. ती इतकी लहान कि जी डोळ्यांना दिसत नव्हती. पण अशी चावली कि गांधं आल. नंतर थोड्यावेळाने एक हातावर चढली. मुंगी बिचारी लहानसा जीव. मी कधी मुंगी पण न मारनारी अहिंसा वादी. पण तिची मला अशी चीड आली थोड्यावेळाने पाहिलं तर बेडवरून भिंतीपर्यंत रांग लागली होती. कारण आंघोळीचे कपडे आणि स्वच्छ धुतलेला पांढरा शुभ्र टोवेल. यात कसल्या येणार मुंग्या. माझ्या गळयावर नंतर पाठीवर सगळी त्वचा लालबुंद अशा ठीकाणी ही मुंगी येते कि आपण तिला शोधू शकत नाही. सगळे धुतलेले स्वच्छ आंघोळीचे कपडे बदलले नवीन धुतलेले घेतले. तरी अंगावत्स्य गांधं आणि लाही कमी होईना अशी चीड आली. पण करणार काय? मला वाटायच ८४ लक्ष योनीतला हा एवढासा कीटक त्याचं पण आयुष्य आहे कशाला मारा. मी कधीच मुंगी मारली नव्हती. नंतर दिवसभर मला सारखा भास होत होता. मुंगी अंगावर चढली की काय?

काही वेळाने पोथी वाचायला बसले. एक तर आधीच उशीर झाला. एक केस माझ्या गळयावर पडला. मला वाटले सापडली मुंगी मी अगदी नेम धरून चिमटीत दाबून पकडली बघते तर काय केस? अशी ही नेमकी मुंगी मलाच चावते. दुपारी जरा पाठ टेकावी तर काहीतर गालावर चावली बहुतेक मुंगी. तिची मला धडकीच भरली आहे. मग ही मुंगी हत्तीला का नाही घाबरवणार! आज बेडवर एक मुंगी दिसली.

अगदी चष्मा लावून पाहीली आणि चक्क एक मुंगी चावली. बघते तर काय भिंतीव रांगच लागली होती. अशी चीड आली पण करणार काय?

मग शोध लागला. मी बाहेर गेल्यावर मुलगा बेडवर खाऊची वाटी, कॉफी चा मग घेऊन बसतो आणि तिथेच ठेवतो. करणार काय? एवढ्या मोठ्या मुलाला ओरडता पण येत नाही! बरं ओरडायला घरात असतात कुठे ही पोरं? आणि आल्यावर कानाला हेडफोन लावून बसतात. अशी चीड आली एवढा मोठा घोडा झाला कि लग्नाएवढा काडीची अक्कल नाही असं स्वत:शीच पुटपूटले.........चीड येते पण करणार काय?

संध्याकाळी जरा खिडकी ऊघडी राहीली कि डास घरात येतात. आणि तो डास नेमका मलाच चावतो. अशी चीड येते. टाळी मारून पकडावा तर आपल्या हाताचा मार आपल्यालाच लागतो आणि डास जातो पळून. प्रत्येक गणपतीच्या वेळी कामवाली गावाला जाते तेव्हापण आठ दिवस भाजी चिरताना किंवा काम करताना बोटाला लागलेल असत.

आणि स्वयंपाक करताना नेमक त्याच जागेवर मीठ मसाला झोंबतो म्हणजे जखमेवर मीठच की अशी चीड येते येऊ दे बाईला. आठ दिवसांनी बाई आल्यावर वाघासमोर शेळी सारख़ी अवस्था होते. कामवाली काम सोडून गेली तर.

बसमधून उतरणारे काही पेसेंजर तिकिट खाली टाकतात, काही गुट्ख्याच पाकीट, काही चॉकोलेट चा कागद टाकतात. अशी चीड येते. स्वच्छता अभियान फक्त पंतप्रधानानीच करावे की काय? यांना बोलणार कोण? चीड येते पण करणार काय? अशा अनेक गोष्टी आहेत. गरम झालं कि AC लावावा तर काही क्षणांत थंडी

वाजली की बंद करावा तर परत लाही लाही. बर कधी कधी तो रिमोट बंद करतच नाही अशी चीड येते.

शाळेत नोकरीला असताना 7/8 कप नक्की चहा होत होता. तेव्हा काहीच नाही झालं. आता तीन कप दिवसभरात झाला तरी पित्त, तोंड कडू अशी चीड येते पण करणार काय?

मग मी काय केल? दुर्लक्ष केलं. आपल्याला सकळचा साखरेचा चहा आवडती होऊ दे. तोंड कडू रोज ठरवते सकळचा बंद करू . संध्याकाळी घेऊ. सकाळ झाली की संकल्प संपून जातो. आपल्याला शुगर नाही बी.पी. लो आहे. मग काय हरकत आहे? होते पित्त मी लक्षच नाही देत. आत्ता हा लेख टाईप झाला कि घेणार चौथा चहा. आपणच किती चिडायच? आणि का? कोण भाव पण नाही देत घरात उलट बाहेर चांगला मान मिळतो.

काही लोकं बसमधून बसस्टॉपवर उतरताच क्षणी हातातल बसच तिकीट खाली फेकून देतात त्यामूळे कचरा होत नाही का? ज्या तिकीटाने आपल्याला आपल्या इच्छित स्थळी पोहोचवल. आपल काम झाल आपला वेळ सार्थकी लागला त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी ते बसच तिकीट पायदळी तुडवण्यासाठी का टाकतात तेच कळत नाही. चीड येते पण करणार काय? सांगणार कोणाला? काही लोकं उगाचच रस्त्यावर थुंकताना दिसतात. आपलं घर स्वच्छ राहाव म्हणून आपण जीवाचा आटापिटा करतो मग हजारो लाखो लोकांच्या सेवेसाठी तत्पर असलेल्या रस्त्याला आपण काय देतो? विचार करण्यासारखी गोष्टआहे. अंतर्मुख होऊ या.

# पूजासाहित्याचे महत्त्व

तुझ्या कांतिसम रक्तपताका

पूर्वदिशी फडकती........

अरुण उगवला, प्रभात झाली

ऊठ महागणपती

देवाच्या पूजेत कोणकोणते पूजा साहीत्यप्रकार आवश्यक असते याचा उल्लेख अभंग किंवा भक्तीगीतात आढळतो.

कितीही साहित्य आपणं आणलं तरी सुद्धा ‘मानसपूजा’ सर्वात महत्त्वाची.

कोणतीही पूजा असली तरी आपण वाण सामानाप्रमाणे गुरुजींकडे पूजासाहित्याची यादी मागतो. त्याप्रमाणे मोजून मापून ते सर्व आणलं कि आपलं मन शांत होते. हे समाधान पूजेच्या माध्यमातून मिळते.

सगुण साकार, निर्गुण निराकार अशा भक्तिचा त्याला शुध्द भोळा भाव आवडतो. संताच्या भक्तीला भुलणारा हा देव आपण त्याला देवळात बंदिस्त केला. वेगवेगळी आभूषण, फूल, पानं, नेवैद्याचे प्रकार, सालंकृत देवाला किंवा देवीला माणसाप्रमाणे वेशभूषा केली. मोदक, पुरणपोळी, शिराप्रसाद, करंज्या, लाडूचे प्रकार, वेगवेगळ्या भाज्या, वरणभात, त्यावर साजूक तूपाची धार, मसालेभात, दहीभात इ विभिन्न प्रकार आपण देवदेवतांना प्रसाद किंवा भोग म्हणून अर्पण करतो.

धूप, दीप, नैवेद्य आणि चंदनाचा लेप कपाळी लावून आपण कृतकृत्य होतो.

चंदनाचा सुगंध, उदबत्ती, धूपाचा दरवळ, नंदादीपा चा सोनेरी मंद प्रकाश यामध्ये आपलं इष्ट दैवत ईतक सुंदर दिसते? अहाहा! आपण देवाशी बोलू लागतो.

प्रार्थना करतो.मागण मागतो. आणि देव देतच राहतो. या सण उत्सवाच्या माध्यमातून आपणही देवाच्या जवळ राहतो.

२४ तास जो प्रज्वलित असतो तो नंदादीप

नंदादीप हा लाविते

लाविते श्रीहरी

जीवनातील कण कण उजळो आस

ही अंतरी

जिथे जिथे हा नंदादीप अखंड तेवत असतो तिथे परमेश्वराच आस्तित्व जाणवते. तो प्रकाश देवदेवतेच्या मुखवट्यावर पडल्यावर देवतेच तेज अजूनच झळकले आणि वेगवेगळ्या पूजा.

मंगलकलशामध्ये पाणी ठेवल जाते. त्यात पैसा किंवा नाण, अक्षता, दुर्वा घालून त्यावर आंब्याची पानं सुंदररित्या सजवून त्यावर श्रीफळ ठेवतात. गुरुजी त्या कलशाच्या आठही दिशांना हळदी कुंकवाचे बोट जेव्हा रेखाटतात तेव्हा

मांगल्य प्राप्त होते.

उठि श्रीरामा, पहाट झाली

पूर्व दिशा उमलली उभी घेउनी

कलश दुधाचा कौसल्या माउली

होमगृही या ऋषीमुनींचे सामवेद रंगले

गोशाळेतुन कालवडींचे दुग्धपान संपले

मंदिरातले भाट चालले गाऊन भूपाळी

# पंचामृतांचही महत्त्व

दूध, दही, मध, साखर, तूप यांच मिश्रण करुन पंचमृत तयार करुन ते देवाला प्रसादाच्या आधी अर्पण केलं जातं, त्यानंतर त्यात पाणी घालून दिवसभर तेच तीर्थ म्हणून मोठ्या भक्तीभावाने आपण प्राशन करतो. त्याचा स्वाद अमृतासमान असतो.

'भक्तीच्या फुलांचा गोड तो सुवास
तुझा देव येतो तुला भेटण्यास
दनाचा देह उटी उगाळीत
प्राणदीप माझा लावी फुलवात
धूप जाळी देवा अंतरीचा ध्यास'

अक्षता तर माणसाच्या जन्मांपासून अखेरच्या श्वासापर्यंत प्रत्येक विधीत केला जातो. १६ संस्कारांत ह्या अक्षता वापरतात. देवाच्या प्रत्येक पूजाप्राकारात अक्षता नसेल तर पूजेची पुर्तता होत नाही. काही ठिकाणी अक्षतांची रांगोळी, काही ठिकाणी अक्षतांचा गणपती करतात. अक्षता हे सुद्धा एक पवित्र साहित्य प्रकार या पूजेत आहे. चौरंग, पाट, नारळ, सुपारी, आंब्याची पानं, कापूर, उदबत्ती, धूप, वस्त्र, उपरण, बसण्यासाठी बैठक, हात पुसण्यासाठी रूमाल, वेगवेगळी भांडी ही यादी न संपणारी नाही. असाच अखंड देवदेवतंचा नाम आपल्या मनात, मुखात अखंड राहू दे हिच प्रार्थना!

या क्षणभंगूर जीवनाला प्रत्येक पूजा, उत्सव आणि सण उजळवून टाकते. देवाचं स्मरण , पूजन, मनन, चिंतन शेवटच्या श्वासापर्यंत ठेवूनच हा आपला नरजन्म सार्थक करुया.

# स्वच्छता ही सेवा

2 ऑक्टोबर 2014 रोजी ‘ स्वच्छता ही सेवा ‘ याचा शुभारंभ झाला स्वच्छता हा आरोग्याचा मंत्र आहे. वेगवेगळया कार्यक्रमाच्या माध्यमातून शहरी आणि ग्रामिण भागात राबवला जातो. घनकचरा व्यवस्थापन आणि घरोघरी शौचालय असे उपक्रम केंद्रिय स्तरावरुन ग्रामिण भागात व काही शहरी भागात राबवून तो उपक्रम यशस्वी केला आहे.

वाढत्या औध्योगिकीकरणामुळे घन कचरा वाढत आहे. वातावरण बदल, वृक्षतोड वाढत्या वाहनांनमुळे होणारे प्रदुषण यामुळे मानवी जीवन आणि सर्व प्राणी पक्षी जीवजंतू यांना ऑक्सीजनचा पुरवठा योग्य प्रमाणात होत नाही.

रोजच्या वापरातून निरोपयोगी होणारा कचरा म्हणजे घनकचरा हा शहरात जास्त वाढला. प्लॅस्टिकचा वापर, शहरीकरण, वाढती लोकसंख्या, शेतातून निघालेला कचरा, कारखान्यातून होणारा कचरा हा सगळा कचरा वातावरण बिघडवतो म्हणून ऑक्सिजनची पातळी व त्याचे संतूलन राखण्यासाठी ‘स्वच्छता हेच जीवन’ यावर फार मोठ्या प्रमाणात भर दिला आहे. ‘ स्वच्छता पंधरवडा’ राबवून समाजात प्रबोधन करणे सुरु आहे.

डम्पिंग ग्राऊंडवर हा सगळा टाकला जातो. ६ हजार मॅट्रिक टन (हजार किलो) कचरा टाकला जातो. त्यामूळे कार्बनमोनाक्साईड, कार्बनडायऑक्साईड, मिथेन यासारखे घातक वायू त्यातून बाहेर पडतात. ते वायू नकळत आपल्या नाकातोंडात जावून माणसाला आजार होतात.

उंदिर, घुशी यांचाही प्रादुर्भाव वाढतो. पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनमध्ये वाहत्या पाण्याबरोबर नद्या, नाले व मातीत ते पाणी जाते. जमीन आणि पाण्याचं प्रदुषण वाढते.

घरात, औद्योगिक क्षेत्र इतर संस्था या वापरण्यासाठी, स्वयंपाक, शौचालय, सर्व माध्यमातून बाहेर पडलेले पाणी गटारातून वाहत जाते. जे पाणी आहे त्याच्या ८०% पाणी तर वाहून जाते वेगवेगळ्या उपयोगातून त्यावर प्रक्रिया करुन जर ते पाणी स्वच्छतेसाठी वापरतो तर पाण्याची टंचाई भासणार नाही.

सांडपाणी प्रकल्प राबवून पुर्नवापर अग्निशमन यंत्रणेत, स्वच्छतेसाठी व ईतर वापरासठी उपयोग होतो.

परिसंस्थेच्या विकासासाठी शुद्ध पाणी वापरता येते. स्वच्छ मोकळी हवा, झाडांचे हिरवेपण, ऑक्सिजन ओझोन याचे संतूलित प्रमाण राखणे हे आपल्या हातात आहे.

पाणी, अन्न वाया न घालवता जबाबदारीने सर्वांनी भान ठेवले पाहीजे.

विद्यार्थी, युवक आणि समाजातील सर्व घटकांनी पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही काळजी घेतली पाहिजे. शाळा कॉलेजमध्ये उपहारगृह असतात . तिथे अन्न आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थंचे कागद , प्लॅस्टिक कव्हर याचा कचरा खूप होतो. तो कचरा व्यवस्थित मार्गाने डपिंग ग्राऊंडवर टाकला तर त्यावर महापालिका प्रक्रिया करते आणि जनतेच्या आरोग्याची काळजी घेते.

टाकलेल्या अन्नावर प्रक्रिया करुन त्यापासून जैविक खत तयार करुन डास उंदीर घूशी आणि इतर उपद्रवी प्राण्यांपासून संरक्षण होते. म्हणून शासनाने ज्या ज्या उपयोगी योजना आणलेल्या असतात त्याला जनतेने प्रतिसाद द्यायला हवा.

स्वच्छता ही सेवा या अभियानामुळे लोकांमध्ये जागृती होत आहे. लोकांची क्रांतीकारी मानसिकता होत चालली आहे. स्वच्छतेबरोबर वृक्षलागवडही होत आहे. राजस्थानमधील झुनर्झनू येथे या अभियानाचा शुभारंभ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

स्वच्छता ही सेवा २०२४ SHSया राज्यस्तरीय अभियानाच्या मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.मुंबईचे पालक मंत्री, आयुक्त,उपनगर पालकमंत्री, जिल्हाधिकारी ३० हजर होते. हे अभियान २ ऑक्टोबर पर्यंत चालणार असून राज्यातील ग्रामीण व नागरी भागात 'स्वभाव स्वच्छता – संस्कार' स्वच्छता ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. या स्वच्छता पंधरवडयात सर्वांचा सहभाग हवा असे मुख्यमंत्री म्हणाले.

# मराठी भाषेला अभिजात दर्जा

माझ्या मराठीची बोलु कौतुके ।

परि अमृतातेही पैजा जिंके

ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन ।।

संपूर्ण जगात महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा प्रेरणा दायी आहे तशीच मराठीभाषा देखील.

अमृतवाणी असलेली जी मराठी भाषा अमृताशीही पैज जिंकणाऱ्या माझ्या आपल्या सर्वांच्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. आजपर्यंत मराठी भाषेसाठी तमाम मराठी माणसाने वेगवेगळया माध्यमातून केंद्र सरकारकडे अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी भगीरथ प्रयत्न केले. २०२३ पासून हा लढा प्रत्यक्ष सुरु झाला.

वाचक, लेखक मोठमोठे साहित्यिक, शिक्षक अभिनेते, संतश्रेष्ठ, विद्यार्थी व वेगवेगळया क्षेत्रातील मराठी भाषिकांनी मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन तिचं भाषिक सौंदर्य संपूर्ण विश्वात पसरावं यासाठी मागणी केली होती. शेवटी शारदीय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी ही शैलपुत्री माता प्रसन्न झाली आणि संत ज्ञानेश्वराच्या या अमृतासमान मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला आहे. आनंदाचे डोही, आनंद तरंग ।।

आज सर्व मराठी मंडळीचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

लीळा चरित्र, ज्ञानेश्वरी. विवेकसिंधू, दासबोध, तुकारामाची गाथा, एकनाथी भागवत, साई सच्चरित्र या सारख्या ग्रंथामध्येही मराठी भाषेच्या गौरव आढळतो. अशा अनेक अपौरूषेय ग्रंथांचा आधार घेत मराठी भाषा हो अभिजातच आहे हे सिद्ध झाले आहे. महाराष्ट्रातील १२ कोटी लोकांप्रमाणेच देशविदेशांत राहणाऱ्या मराठीप्रेमीला आनंद झालाआहे. को. म. सा.पं. च्ये माध्यमातून आम्ही सुद्धा सर्वानी पत्रलेखन करून अभिजात दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न केले महाराष्ट्रावर अनेक स्वाऱ्या आल्या होत्या त्यामुळे मराठी भाषेवर परिणाम झाले आपल्या अनेक भाषांवर अनेक भाषांचा आघात झाला तरी मराठीचे महात्म्य अजून टिकून आहे. आता मराठी भाषा बोलीभाषा आणि मराठी भाषेचे संवर्धन आणि संस्करण आणि जतन करण्याची आपली जबाबदारी आहे.

बोलू मराठी,वाचू मराठी

तुझी माझी आपली सर्वांची मराठी

याआधी तामिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड आणि मल्याळम ओडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला मिळाला आहे.

आता 3 ऑक्टोबर २०२४ रोजी आपल्या मातृभाषा मराठी सह पाली, बंगाली, आसामी आणि प्राकृत भाषेला अभिजात भाषेच्या दर्जा मिळाला आहे.शिवछत्रपती शिवाजी महाराजांनी पहिला मराठी संग्रहकोष निर्माण केला. स्वा.सावरकरांनी त्यात भर घातली अनेक मराठी शब्दांचे अर्थ सांगितले.स्वा. सावरकर, वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज यांच्यासह भूतकाळात ज्यांनी मराठी भाषेसाठी आयुष्यभर प्रयत्न केले त्या सर्वांना विनम्र अभिवादन!

आजचे वर्तमानकाळातले सर्व जेष्ठ, श्रेष्ठ, लेखक साहित्य व वाचक मंडळीचे अभिनंदन।

प्रसिद्ध साहित्यिक रंगनाथ पाठारे यांच्या अध्यतेखाली कनिष्ठ समितीने संशोधन करून अनेक ग्रंथांचा आधार घेऊन अप्रतीम असा निर्णय दिला आहे. म्हणून परीक्षकाचे, संशोधन समितीचेही खूप अभिनंदन!

ज्या ज्या भाषांना अभिजात दर्जा मिळतो असा भाषा अधिक संपन्न होण्यासाठी २५० ते ३०० कोटी रूपयाचे अनुदान दिले आते ते आता आपल्या मराठी भाषेलाही लागू होईल.

आज मराठीतील संत, तंत, पंत हे सर्व या पालखीचे भोई आहेत. त्यांना ही आनंद झाला असेल. ज्यांनी ज्यांनी मराठी भाषा संमृद्ध, संपन्न आणि आपल्या शब्दसामर्थाने श्रीमंत व सुंदर केली त्या सर्वांना मानाचा मुजरा.

# मन करा मोठ

मन इतकं मोठं करा कि कुणीने आपल्याशी बोलायला, व्यक्त व्हायला आले पाहिजे. चार प्रेमाचे शब्द ऐकण्यासाठी सर्वांचेच कान आसुसलेले असतात. हा लहान हा मोठा असा भेदभाव केला तर त्याने काय साध्य होत नाही. उगाच वातावरण बिघडते अहंकाराने क्रोध निर्माण होतो. प्रेमाचा अभाव निर्माण होतो.

शब्दांनी मन जपलं की यश, प्रेरणा मिळते. शब्द आयुष्यभर भावना देतात. शब्द दुधारी तलवारी प्रमाणे असतात. ते जपून वापरले पाहिजेत. तरच आपलं आयुष्य समाधानकारक जाईल.

आयुष्य अवघड आहे असं नाही. सर्वोत्तम जीवन त्यानांच मिळते जे कंष्ट करतात मेहनतीने द्रव्य मिळवतात. थोडा धीर धरला सबुरी ठेवली तर सर्वकाही मनासारखं घडेल. आयुष्यात आनंद निर्माण करण्यासाठी कष्ट, मेहनत, जिद्द आणि आशावादी राहणे गरजेचे आहे.

इतरांना पदोपदी मदत करण्याची इच्छा असली कि आपल्या हातून कार्य घडते. आपल्याला ही बरं वाटतं आणि समोरच्याला सुद्धा. आपल्याकडून समाजाच्या अपेक्षा असतात. रोज कोणी आपल्याकडे मदतीची याचना करत नाही पण खरच एखाद्या व्यक्तीला मदतीची गरज असेल तर तो मोठया मनाने केली पाहिजे. व्यक्तीला कधीही काहीच कमी पडत नाही. ज्यांच्या भोवती सतत माणसाची गर्दी असते. आबाल वृद्धांशी त्यांची मैत्री असते.

समाजात अशी खूप माणसं आहोत. ती गरजूंना मदत करतात. रतन टाटा यांना लोक मृत्यूनंतर

आठवतात. कारण त्यांनी तळागाळातल्या लोकांपासून ते उच्चभ्रू पर्यंत ज्यांना जे जे हवे तेते पुरवत होते. भारत देशावर त्यांच खूप प्रेम होत. आपल्या देशातील कोणत्याही व्यक्तीने मदत मागितली तर ती कधीच विन्मुख पाठवत नसत.

आपल्याला अशी मदत करायची नाही तर कुणाला बस, रेल्वे गाडीत बसायला जागा देणे, योग्य सल्ला, महतीचा हात देणे, जे आपल्याकडे आहे व आपण याचना कर्त्यास सहज पणे देऊ शकतो. अशांना मनापासून मदत करावी. त्यामुळे आपलही भलच होते.

माणसाला मनासारखं जगण्यासाठी सुद्धा मन मोठं करावं लागत. समोरची व्यक्ती काही सांगत असेल तर ते ऐकून घेण्याची तयारी असायला हवी. त्या म्हणण्याशी सहमत असो कि नसो पण ऐकून घेण्याची क्षमता हवी. त्यमुळे नवीन दृष्टीकोन शिकायला मिळतो आणि शिष्टाचाराला धरूनही वर्तन होते. तसच त्याचा आपल्याला विचार करून भावना ओळखून त्यावर व्यक्त होणे सोपे जाते.

मोठया मनाने एखाद्याला मदत करणे, माफ करणे या गोष्टी मनाच्या मोठेपणा अवलंबून आहेत. संकुचित मनाने या गोष्टी शक्य होणारच नाही.

फूल कितीही सुंदर असू द्या, कौतुक त्याच्या सुगंधाचे होते. माणूस कितीही मोठा झाला तरी कौतुक त्याच्या गुणाचे, विश्वासाचे आणि चांगल्या वर्तनानेच होते. नात्यापलीकडील नाती बनवण्यासाठी मन मोठे करण्याची आवश्यकता असते.

# दृष्टीकोन

आपण म्हणतो एका हाताने टाळी वाजत नाही पण त्याचा अर्थ वेगवेगळ्या प्रकारे घेतला जातो. आपण केलेले कष्ट, घेतलेले परिश्रम आणि कर्म यांचा दाट संबंध असतो.

एका हाताने टाळी वाजण्यासाठी दोन्हीकडून प्रयत्न आवश्यक आहेत.

एका शेतात मुलगा आणि आजोब काम करत होते. मातीची ढेकळे फोडत होते ७० वर्ष आजोबा नातू १७ वर्षाचा माती खोदत असताना आजोबा घामाघूम होऊन कष्ट करत होते. प्रत्येक घाव कर्तव्य भावनेने करत होते. त्याची काही तक्रार नव्हती.

नातू प्रत्येक घावा बरोबर तक्रारीचा सूर काढत होता पुटपुटत काम करत होता.

नातू म्हणाला - आजोबा माझ्या मातीचा ढिग का कमी? तुम्ही एवढी माती कशी फोडली? आजोबा म्हणाले तुझ्या कामाला तु विचार जास्त करतो त्यामुळे विचारातच तुझा वेळ जातो. हे काम कठीणच आहे. काम किती केल त्यापेक्षा ते कसं केल यावर त्या कामाची यशस्विता अवलबून असते. त्या गोष्टीकडे पाहण्याचा द्रूष्टीकोन सकारात्मक हवा.

ज्या गोष्टीकडे आपण ज्या भावनेने पाहतो तीच भावना आपल्या मनात संचार करते आणि त्याप्रमाणे मेदू कार्य करतो व त्याचा परिणाम कामावर होतो. कोणतही काम कसही असू दे. आपल्याला करायच आहे. ते चांगल्या प्रकारे करायचं आहे. असा सकारात्मक विचार जर आपण केला तर ते काम कमी वेळात आणि यशस्वी होते.

एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा विशिष्ट मार्ग म्हणजे दृष्टीकोन. या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. दृष्टीकोन हे विशिष्ट कार्य, समस्या किंवा परिस्थिति कशा प्रकारे हाताळली जाते याची रूपरेषा होते. परिस्थितीकडे पाहण्याचा एक मार्ग किंवा मत.

वास्तविक जीवनातून किंवा कल्पित गोष्टींमधून एखाद्या परिस्थितीत सामील असलेल्या व्यक्तीचे मत किंवा भावना दाखवते.

प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगळा असतो. कधी कधी आपण एखाद्याला मदत करायला जातो पण तीच व्यक्ती आपल्याशी वाद घालते. कारण त्यांना आपल्याकडून जास्त वस्तूची, द्रव्याची अपेक्षा असते. त्यामुळे त्यांचा अपेक्षाभंग झालेला असतो. त्यामुळे आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतो.

# दिवाळी नंतरची हुरहुर

दिवाळीची आणि मे महिन्याची सुट्टी संपली की शाळेचा पहिला दिवस कसा कंटाळवाणा असतो तसचं काल पर्यत दिवाळीचा सण, फराळ, भेटीगाठी, मजा यानंतर दुसऱ्यादिवशी कामावर, शाळेत कॉलेजात जाताना हुरहुर लागते त्यास Post holiday Dream असं म्हणतात.

काल रात्रीपर्यंत फटाके फोडणे एकमेकांकडे जाणे, छान छान स्वादिष्ट पदार्थ खाणं, आवडत्या माणसांना भेटणं अस सगळ चाललेल असत. दुसऱ्या दिवशी नित्य नेमाने शाळा कॉलेज किंवा कार्यालयात जाताना नक्कीच सर्वांना हुरहुर लागलेली असते. हि दिवाळी अशीच काही दिवस सुरू राहावी असं वाटत राहते.

घराघरात स्वादिष्ट पदार्थाचा सुगंध अगरबत्तीचा दरवळ, मंद तेवत असलेली पणती नवनवीन कपडे., नवे विचार, नव्या ओळखी, विस्मरणात गेलेल्या किल्ल्यांचे दर्शन त्याची माहिती आणि छात्रपती शिवाजी महाराजांची, रांगोळ्याची नक्षी, सप्तरंगी आकाशकंदील प्रकाशाच्या माळा आता हे सर्वच दिवाळी नंतर दिवसांत काढणार आणि त्यानंतर मनात एक अनामिक हूरहूर लागते त्याचे वर्णन नाही करू शकत.

प्रत्येकाच्या मनांत ही हुरहुर असते. या भावना खऱ्या असतात. दिवाळी नंतरचा सोमवार अधिकारी, साहेब याची कटकट परत सुरु होणार. त्याचाच दुसऱ्या बाजूने विचार केला तर दिवाळी संपल्यानंतरच्या दिवसात खूप खूप काही करण्यासाठी बरच काही असते.

व्हॉट्सॲपवर खूप संदेश, पणत्या शुभसंदेश असतात ते डिलिट करू शकतो. दिवाळी अंक जे आपण घेतलेल किंवा ग्रंथालयातून आपले असतील ते पूर्ण आपण वाचु शकतो. फोनवरुन आपल्या आप्तेष्टांना किवा आवडत्या व्यक्तीशी बोलावे दिवाळीनंतर घरात दारात पडलेला पसारा काढण्यासाठी घर, परिसर स्वच्छ करायला मदत करता येते. त्यामुळे मनातील मळभ दूर होऊन हूरहूर कमी होऊन प्रसन्न वाटेल.

आपल्याला आलेल्या भेटीचं आवरण काढून आत काय असेल ही उत्सुकताच हूरहूर संपवून टाकेल.

करण्यासाठी आपल्याकडे बरच काही असत पण त्या दृष्टीने विचार करून तो आचरणात आणायला हवा.

दिवाळी ५ दिवसापेक्षा जास्त दिवस राहिली तर तिचं महत्त्व इतक राहणार नाही जेवढ आपण आता अनुभवतो.

कार्यालयात जाताना घरचा फराळनेऊन तो चहाबरोबर सगळ्यांबरोबर खाताना खूप छान वाटते दादर ठाणे सारख्या मध्यवर्ती रेल्वे स्टेशनवर जी गर्दी असते ती कमी झालेली की छान वाटते.

दिवाळीनंतरची दिवाळीमध्ये उरलेल्या पदार्थावर अनेक प्रयोग करून त्याचे वेगवेगळे नवीन पदार्थ

बनवून खाता येतात.

जोपर्यंत आकाशकंदील आहेत तोपर्यंत दिवाळी संपली अस वाटत नाही.

पूर्वी भारत पाकिस्तान सामना असेल त्यासाठी फटाके सांभाळून ठेवले जात.

त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत दिवाळी संपत नाही.

चिवड्यामध्ये कांदा, मिरची, कोथिंबिर घालून छान चमचाने खाता येतो. चहाबरोबर शंकरपाळी आणि चकली खाता येते. चांगले पदार्थ संपून जातात. करंजीचं उरलेल सारण असतं.त्यात साजुक तूप, डिंक वैगेरे जिन्नस घालून लाडू करून खायला मजा येते. दिवाळी नंतरची हुरहुर घालवण्यासाठी नवीन कपडे घालून कामावर जाणं पदार्थावर वेगवेगळे प्रयोग करून त्याच नवीन पदार्थ करण्यात एक वेगळी मजा असते.

सहकार्याबरोबर घरी आवडत नसलेला पदार्थ स्वादिष्ट लागतात. सगळयात शेवटी उरतो तो चिवडा. तरी प्रतेकाच्या डब्यातला चिवड्याची चव वेगळी.

अशी ही सरलेली दिवाळी वेगवेगळया माध्यमातून परत नव्याने साजरी करुन आपल्या मनातील हुरहुर कायमची दूर करता येते.

# मनापासून दिलेली दाद

प्रत्येक माणसाला आपली कुणीतरी स्तुती केली तर आवडते,गृहिणीने सर्वांसाठी केलेला स्वयंपाक, एखादा लिहिलेला लेख, सुंदर अभिनय, सर केलेला गड, एखाद्या गोड छोट्यश्या मुलीने नेसलेली साडी या सर्वासाठी माणसांनी दिलेली शाबासकी असते त्यालाच मनापासून दिलेली दाद असे म्हणतात.

आजूबाजूला डोळे उघडे ठेवून जर नीट आपण पाहिलं तर बऱ्याच गोष्टी दाद देण्याजोग्या असतात.

पण आपण काय करतो ? त्यात काय मोठ ? असं हलक्याने घेतो. किंवा त्यास इतक महत्त्व दिल जात नाही. जेव्हा एखाद्या कलाकुसरीला कौशल्याला किंवा कलाकृतीला मनापासून दाद दिली तर त्या व्यक्तिचे व्यक्तिमत्त्व खुलते.

काही लोक अजिबातच दाद देत नाही किंवा त्यात काही वाटत नाही.पण मला वाटते प्रत्येकाच्या चांगल्या कलेला त्या त्या गोष्टीला मनापासून दाद दिली तर आनंदाने जगण्याची ती वाट ठरू शकते.

उपहारगृहात जेवण झाल्यावर कोणता पदार्थ नक्की स्वादिष्ट वाटला ते त्या तिथल्या वेटरला किवा कॅशियरला जर सांगितल तर त्यांचे चेहरे नक्की उजळतात. कारण त्यांनी वेळ घालवून कष्ट करून मोठ्या जिद्दिने ते काम केलेले असते.दाद देताना आपल्यालाही किंवा मनापासून दाद देणा-यालाही खूप छान वाटते.

तनामनाला सुख देणारा तो आनंद असतो. काही लोक स्वच्छंदी पणे जगतात. तर काहीजण खूप परोपकारी असतात.

नैराश्यावर सकारात्मकतेने मात करता येते.

धन्यवाद, कृपया, यासारखे शब्द जर योग्य वेळी आणि सहजपणे वापरले तर कृतज्ञता व्यक्त केल्याचा आनंद दोन्ही बाजूच्या व्यक्तींना होतो.

कृतज्ञता व्यक्त करता आली पाहिजे ती पण वेळेत. कोणत्याही गोष्टीची वेळ निघून गेली तर त्याचा

फारसा उपयोग होत नाही वेळच्यावेळी त्या त्या व्यक्तिने आपल्यावर केलेले उपकार असतील प्रेमाच्या चार शब्दानेही कृतकृत्य होता येते. फक्त गरज आहे मनापासून दाद देण्याची.

कौतुक केलेल लहान बाळालाच नाही मोठ्यानाही आवडते. कौतुकामुळे जीवन जगण्याचा आनंद वाटतो.

आनंदवृक्ष नक्कीच बहरून जातो. दोन शब्द गोड बोलून मनापासून दाद दिली तर देणाऱ्यालासुद्धा सकारात्मक वाटत असते.

प्रसारमाध्यमावरील बातम्या, जाहिराती, कार्यक्रम, आवडती मालिका, कौन बनेगा करोडपती सारख्या कार्यक्रमात मुलांनी किंवा कोणत्याही स्पर्धकाने दिलेली अचूक उत्तर किंवा त्यांना मदत करणारे यांना ही आपण तिथेच मनातल्या मनात दाद देऊनच टाकतो. क्रिकेटचा सामना, छान संदेश देणारे चित्रपट यांना आपण दाद देतोच पण आपल्या आजुबाजूला नित्याच्या खूप छान छान अशा गोष्टी आहेत ज्याकडे आपण लक्षच देत नाही. पण त्या प्रत्येक गोष्टीकडे निरीक्षणपूर्वक पाहून चांगल्या परिणामकारक प्रत्येक गोष्टीला मनापासून दाद देऊन बघा आपल्याही मनाला उभारी मिळते. याची अनुभूती येते.

काही लोकांना प्रशंसा, कौतुक करण्यात काही विशेष वाटत नाही. काही पालकाना वाटते मुलांना उगीच कौतुक केल कि ते बिघडतील, हट्टी होतील.

पण मुलांचे कौतुक करण्यापेक्षा त्याच्या मेहनतीचे, कौशल्याचे कौतुक जरुर करावे. विशेषत: लहान मुलांचा आत्मविश्वास वाढावा कारण हे स्पर्धेच युग आहे.

ध्येय गाठण्यासाठी मुलांनी दिलेला वेळ दाखवलेली चिकाटी, एकाग्रता याचं नक्कीच कौतुक करावं कि जेणे करून त्यात अपयश जरी आलं तरी त्याला पुढच्या वेळी काहीतरी करून दाखवण्याची इच्छा निर्माण होईल.

छान चित्र काढल, सुंदर गाणे म्हटलं, नयन रम्य नृत्य, मेहनतीने केलेला अभ्यास पहिला काढलेला नंबर याच कौतुक करायला च हव. कारण मेहनतीचं कौतुक करून योग्य पद्धतीने मुलांचे दोष ही चांगल्या शब्दात समजावून सांगायला हवे. कारण लहान मुलांना सोग्य वेळी योग्य उपदेश करणे व मनापासून दाद हो देणे आवश्यक असते.

घरी आलेली कामवाली मावशी, ड्रायव्हर, पोळया करणारी बाई, सोसायटीचा वॉचमन यांना जर

आज तुम्ही छान काम केल हो अशी स्तुती केली तर त्यांच्या कामाचा हुरूप वाढतो. माणूस स्तुतीप्रिय असतो. योग्य व्यक्तींना दाद दिली पाहिजे.

# ऋणानुबंध

आपल्या जीवनात आलेली माणसं उगाच आलेली नसतात. त्याच्याशी आपले काही तरी ऋणानुबंध असतात. कधी कधी दररोज भेटणा-या माणसाचं आपल्याला काहीच वाटत नाही. पण हीच व्यक्ती आपल्या रोजच्या दैनंदिन व्यवहारात आजुबाजुला काम करताना येता जाताना किंवा न भेटल्यास मनोव्यापारात का भेटते?

याचा कधी विचार केलाय का ? याच जर सखोल विचार केला तर ती व्यक्ती नक्की पूर्वजन्मातली नक्कीच कुणीतरी असते. यात काहीही अंधश्रद्धा मानसिक असंतुलन किंवा भास नाही.

प्राणातील आपल्या श्वासाइतकेच आपल्याला भेटलेल्या व्यक्तीचं महत्त्व जीवनात असते. याची प्रचिती कधी लवकर येते, कधी उशीरा, तर कधी कळतच नाही. पण त्याचे महत्व फारच मोठे आहे हे मात्र नक्की.

काही माणसे एकदाचं भेटतात पण आपल्यावर प्रभाव पाडून जातात. केव्हातरी ती व्यक्ती गुढीपाडवा दिवाळी किंवा नवीन वर्षाच्या सुभेच्छा देते. आणि पुन्हा एकदा आपल्या मनावर राज्य करते अगदी नकळत आपले तेवढ्यापुरते प्रतिसाद देऊन मोकळे होतो पण ऋणानुबंध...! ते संपलेले नसतात. काही व्यक्ती रोजच भेटतात पण संवाद होतोच अस नाही.

काही व्यक्ती आपल्याला सहज मदत करून जातात. काही व्यक्ती मदत मागितली तरी सबवी सांगून टाळतात. काही भेटलेल्या व्यक्ती तटस्थ राहतात. काही

लोक संपर्क साधतात. अशा वेगवेगळया ठिकाणी भेटलेल्या व्यक्तीचे आपल्या जीवनात काही तरी स्थान असते.

काही लोकांना मदत म्हणून काही करण्याची गरज वाटू शकत नाही.

काही व्यक्ती अनोळखी असतात. त्या केव्हातरी एखाधा प्रसंगी प्रवासात आपल्याला भेटतात व एका कटाक्षात आपल्या जिव्हाळयाच्या होऊन जातात. पूर्वाजन्मीचे ऋणानुबंधच ते पण लक्षात कोण घेतो?

कधी कधी दुचाकी एखाद्या ठिकणी आजुबाजुला पार्क करण्यासाठी आपण जातो. आणि तिथे अनेक गाड्या लागलेल्या असतात. ती काढताही येत नाही. अडचणीत सापडतो. लगेच कुणीतरी येऊन. आपल्याला मदत करतो तेव्हा आपल्याला आश्चर्य वाटते. पण त्याच्याशी आपलेपूर्व संबंध असतात.

कधी कधी अनोळखी लोकच मदत करताना दिसतात, त्यांचं आपल्याला नावही माहित नसत.पण त्याच्या कृतीतून, देहबोलीतून आणि सौजन्यपूर्ण वर्तनातून ती व्यक्ती ओळखीची वाटू लागते असे अनेक अनुभव आपल्याला पदोपदी आलेले असतात.

# शोध

एखादी वस्तू आपण उगाचच शोधत राहतो. ती आपल्या जवळपासच कुठेतरी असतो. आपल्या सर्वाच्च्यात देव आहे आपण देवाला पाहायला शोधायला पूजायला देव्ळात जातो. देवाचा शोध घेताना तो

तो पूर्ण होईल की नाही याची खात्री नसते. पण तो असतोच आहेच देव प्रत्येकामध्ये आहे. सत्कर्मात आहे. परोपकारात आहे. देव संत्यात आहे

प्रामाणीक पणात आहे. जे ने सात्त्वक, सुंदर, खरं आहे तिथे देव राहतो. त्याला शोधायची गरज नाही पण आपण सर्वसामान्य माणसं देवाला शोधत राहतो. देव आपल्याला पाहतो पण आपण दगडाला पूजतो. माणसाच्यातला जो आत्मा आहे त्याला आपण पाहत नाहीत. देव आपल्या अंतरी असून आपण जातो तीर्थावरी.

संत तुकाराम म्हणतात

‘भक्तीचिया पोटी

बोध काकडा ज्योती

पंचप्राण जीवे भावे

ओवाळू आरती’

देव शोधायला भक्तीमार्ग सापडायला जन्म जन्मांतरीचा पुण्यसंचय हवा. पण संतसंग लाभला कि ही वाट सोपी होते.

‘ते नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद’ देवासारखा कारागिर दुसरा नाही पृथ्वीवर जन्म मृत्यू हा अटळ सिद्धांत. त्याच्या परवानगी शिवाय पानही हलत नाही. अशा

देवाला मात्र आपण शोधत नाही. शोधायचाच असला तर आपण देवळात जातो. किंवा तीर्थ यात्रेला पण तो तिथेही नाही तो सर्व चराचरात भरून उरलेला आहे तो सगुण आहे कि निर्गुण ......? याच संभ्रमात आपण पडतो आणि त्याला शोधत राहतो.

‘देव देवाऱ्यात नाही

देव नाही देवालयी

देव शोधून देईल

अशी कोणाची पुण्याई’

शेवटी ज्याच्या त्याच्या पुण्याईवर आणि प्रारब्धाप्रमाणे आपण देवाकडे ओढले जातो किंवा दूर जातो. देवाला शोधत बसू नये. आपली जी इष्टदेवता असेल तिचे नामस्मरण, वाचन. पठण, स्तुती करावी. आपोआपच ते इष्टदैवत आपल्या नजरेसमोर येऊन आपल्या प्रत्येक कामात यश देते असा अनुभव आहे.

एखादं पुस्तक किंवा चष्मा कुठे ठेवला कुठे ठेवला आपण घरभर शोधत राहतो कारण एक तर आपण त्या वस्तूची जागा बदललेली असते किंवा कुठे ठेवली ते नक्की आठवत नसते. हाच नियम आपण सगळीकडेच लावतो. पण त्यामुळे कोणताच शोध लागत नाही.

कधीकधी हाताशी असलेली वस्तू आपल्याला सापडत नाही झाला शोध सुरु काहीवेळा घरातल्या घरात वस्तू जेव्हा सापडत नाही तेव्हा ज्या ठिकाणी उभे होतो तिथे पुन्हा जावे म्हणजे आठवते.

माणसाच्या मनात अनेक शोध सुरू असतात. ते कधी वैयक्तिक तर कधी सामाजिक स्वयपाक घरातील पाककृतीपासून अंतराळातल्या घडामोडी मन शोध

घेत फिरत असते. हे मन थकत नाही बर का! शोध घेता थकून भागून जाते ते शरीर. असा हा शोध प्रत्येक माणूस आयुष्य भर असा हा शोध घेतच राहतो. तरी काहीतरी शोधयच बाकी राहत.

नदीच मूळ आणि ऋषीमूळ कधी शोधू नये असं आपले पूर्वज म्हणतात तरी जे शोधू नये त्याचाच शोध घेण्याची उत्स्कूलता जास्त असते.

शोध सतत सुरू राहावा पण चांगच्या सकारात्मक गोष्टीचा. निरर्थक शोध घेण्यात काहीच अर्थ नाही.

# १४ नोव्हेंबर बालदिन

प्रत्येक लहान मूल हे निरागस असते.त्याच्या हालचाली त्याच वावरणे हे सर्वांनाच आवडते.

‘करी मनोरंजन जो मुलांचे,

जडेल नाते प्रभुशी तयाचे’

असे पूज्य साने गुरुजी म्हणतात. साने गुरुजींना मुले आवडत असत. ते शिक्षक असल्यामुळे मुलांच्या सहवासात त्यांच्या खुप वेळ जात असे. निराधार मुलांना त्यांनी आश्रय दिला.

१४ नोव्हेंबर पं. नेहरूंचा जन्मदिन संपूर्ण भारतभर १४ नोव्हेंबर हा बालदिन म्हणून साजरा करतात. पंडित जवाहरलाल नेहरू लहान मुलामध्ये रमायचे, त्यांनाही मुल खूप आवडत असत. लहान मुलं ही भविष्यात देशाचे अधार स्तंभ बनू शकतात. त्यासाठी त्यांना लहानपणापासून योग्य मार्गदर्शन सकस आहार, आदर्श संस्कार घडवणे गरजेचे आहे. त्यामुळे त्याच्यांतील सुप्त गुणांना वाव मिळतो. मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या कार्यक्रमाचं आयोजन केलं जात. असं पं. नेहरूंचा जन्मदिन देशभर बालदिन म्हणून १४ नोव्हेंबरला साजरा करतात. विविध स्पर्धा, साधन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

आता दिपावलीचा उत्सव सुरू आहे या दिवसात मुलांना सुट्टी लागते. आमच्या पाचपाखाडी भागात सोसायटी समोर चाळीतल्या मुलांनी एक सुंदर किल्ला तयार केला सहज थांबून त्या किल्ल्याजवळ गेले. एक मुलगा फक्त उभा होता. बाकी सगळी मुलं निघून गेली होतो. मी विचारल, त्यला "काय रे कोणता

किल्ला? सिधुदुर्ग किल्ला? किल्यावर सैनिक वैगरे नाही. हो मॅडम हा सिधुदुर्ग किल्ला आहे. त्यावर त्या मुलांनी आजुबाजुच्या सोसायटीची नावं, रस्त्याची नावं लिहिली होती. आमच्या सोसायटीच नाव का नाही लिहिले . तर तो हसला. मी ही हसले, आणि त्याला १०० रू दिले. त्याचा आनंद गगनात मावेना किती निरागसता त्याच्या चेहऱ्यावर होती.

मग त्याने माझी चौकशी केली तुम्ही कुठे राहता? ह्या समोरच्या सोसायटीत तेवढ्यात अजून एक हिंदी बोलणार मुलगा आला. लहान मुलांचे हात असे जेव्हा विधायक कामासाठी सरसावतील तेव्हा खरच पं. नेहरूंच स्वप्न साकार होईल अस मला वाटून गेल.

अशी बरीच उदा. आपल्या समोर असतात फक्त गरज आहे निरीक्षणपुर्वक त्यांच्याकडे पाहण्याची.

# संगीत

संगीत ही साधना आहे. संगीतामुळे मन प्रसन्न होते. मनावरचा ताण निघून जातो. संगीत ही एक थेरपी आहे. या संगीताच्या माध्यमातून अनेक आजारावर उपचार केले जातात. माझे जीवन गाणे गाणे SSS

गाणं हा आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे.मी तर लहानपणापासून रेडिओवरची गाणी ऐकत आले. आजही रेडीओ F.M वरची मराठी हिंदी गाणी ऐकणं हा माझा छंद आहे. मराठी कोणत्याही प्रकारची गाणी मला विशेष आवडतात. भक्तीगीतं, भावगीत, नाट्यसंगीत, लोकगीते, यावर जास्त प्रेम आहे. आवडती गाणी अनेक आहेत, पण विशेष भावगीतं जास्त आवडतात. मंगश पाडगावकराची अरुण दाते यांनी गायलेली गाणी मनाला भावतात, आरती प्रभू. शांता शेळके,संदीप खरे, गदिमा नवी जुनी सर्व गाणी ही यादी मोठी आहे.

माझे गाणे एकच माझे

नित्याचे गाणे.

आवाज व वाद्य वाजविण्याची क्रिया म्हणजे गायन. कवितेच्या अंगभूत लयीतून सूरांची रचना बसवून त्याचे गीत बनवतात. गाण्यामुळे मन प्रसन्न होते. प्रसन्न मनात चांगले विचार रुजतात. हाती घेतलेले काम चंगले होते. गाडीमध्ये सुद्धा रेडियो ऐकताना प्रवास सुकर होतो. गाणी ऐकता ऐकता आपण कधी गुणगुणू लागतो. ते कळत नाही. ऐकलेल्या गाण्याचा अर्थ त्याचे रसग्रहण लिहावेसे वाटले. मी कधी कधी तर

हृदयस्पर्शी गाण्यावर लेख लिहिते आणि वाचकांना ते लेखन आवडते असा अनुभव आहे.

‘हिरवा निसर्ग हा भवतीने

जीवन सफर करा मस्तीने

मन सरगम छेडा रे

जीवनाचे गीत गा रे,

गीत गा रे धूंद व्हा रे ‘

अशी आणि इतर गाणी ऐकल्याने मन ताजतवाने होत मनावरच मळभ दूर होते आणि पुढच्या जबाबदाऱ्या राहिलेली कामे करायला आपण सज्ज होतो.

संगीताचे अनेक प्रकार आहेत, पण प्रामुख्याने शास्त्रीय संगीत आणि सुगम संगीत हे दोन प्रकार जास्त प्रचलित आहेत. त्या नाट्यसंगीत आणिभावगीत आपल्याला जास्त भावतात. मंगेश पाडगावकरांची गीत अरुण दाते, जगदिश खेबुडकर सुधीर फडके या गायकांची गाणी कुणाला आवडणार नाहीत. गाण्याच विश्वच वेगळे. श्रावणातल वर्णन करावं ते पाडगावकरांनीच.

‘श्रावणात घन निळा बरसला

रिमझिम रेशिमधारा

उलगडला झाडांतून अवचित

हिरवा मोरपिसारा’

अहाहा !!!

त्या फुलांच्या गंध-कोषी

सांग तू आहेस का?

हे एक भक्तीगीत आहे. त्याच्या गहन अर्थात फक्त परमेश्वर आहे.

शब्दरचनेला सुरावटीत बांधले की त्याचे गीत बनते, गीत हे शब्दांचे समूह असतात.

गाण्यामध्ये अनेक भिन्न घटक असतात. गाणं, श्लोक, परावृत्त, मीटर गाणं हे कोणतही, कसली आणि कोणत्याही भाषेत असेल तर माणसाला डोलयला लावतेच. संगीत ही साधना आहे आयुष्यभर करण्यासाठी

पृथ्वीवर बहुधा असा एकही माणूस नसेल ज्याला गाण आवडत नाही. हजारो वर्षांपासून माणसाला

गाण्याने आकर्षित केले आहे. माणूस आपल्या भावना, इच्छा, आशा आणि स्वप्न सुरेलपणाने गाण्याच्या माध्यमातून व्यक्त करतो.

गाण्यात ध्रुवपद, मुखडा, अंतरा आणि मीटर याप्रमाणे प्रमाण असत गीतात गेयता असते.

मराठी रसिकांना लावणी हा प्रकार खूप आवडतो. स्त्री सौंदर्य वर्णन करणारी,वाटपाहणारी, विरह दु:ख,तडजोड या भावना लावणीत असतात.

वीर, कारुण्य, श्रृंगार यांची शब्दबध्द मांडणी म्हणजे लावणी. लावणी सारखे अनेक गीतप्रकार आहेत. बैठकीची लावणी, फडाची लावणी, शाहिरी लावणी हे लावणीचे प्रकार भक्तीगीत, भावगीत, समरगीत असे अनेक गीता चे प्रकार ऐकायला खूप छान वाटते मानसिक ताणतणाव कमी होतात.

# किल्ली

लहानपणापासून खेळण्यातल्या गाडीला किल्ली दिल्ली कि ती भरकन पुढे जाते गतीमानतेतला आनंद गवसतो.

पण मोठेपणी ब-याच किल्ल्या(चाव्या) सांभाळाव्या लागल्या आणि त्या लीलया पेलल्या.दाराच्या लॅचच्या चावी सोसायटीच्या जोशीकाकूकडे ठेवण्याचा आमचा प्रघात. कधी कधी दमून थकून उशीरा आल्यावर सगळी पर्स पालथी घालून सुद्धा आपल्याच घराची किल्ली एवढी मोठी की चेन असून सुद्धा सापडत नाही. आणि कपाळावर घामाच्या धारा, पायच काय हात पण दुखतात पण ही किल्ली जास्तच भाव खाते. एक दिवशी असच झाल. शाळेच्या भल्या मोठा प्रमोशनच्या मानाने किल्ल्यांच्या जुडगा, स्कूटरची चावी, कपाटाची चावी अश्याच ब-याच किल्ल्याचा एकच कप्पा पर्सच्या कप्प्यात. मग काय केल ? सरळ पायरीवर बसून घेतल म्हटल आता आरामात लॅचची चावी शोधू. आजुबाजुच्या शेजारच्या फ्लॅटवाल्याच्या चपला, बूट, सरळ हाताने सर्व शक्तीनिशी सरकवून बसले. मनात म्हटल साडी आपल्यासाठी कि आपण साडीसाठी! जाऊ दे आता साडीला जपायच नाही स्वतःला जपायच. बसले किल्ली शोधायला - दार बंद किल्लीने संप केलेला, शाळेतून आल्यामुळे बाटलीतल पाणी संपलेल. तेवढ्यात शेजारच्या बाई अचानक बाहेर आल्या,अहो तुम्ही खाली इथे का बसलात ? घरात या पाणी देऊ का ? मी म्हटल मीच किल्ली ठेवली आहे पण सापडत नाही.

मग मात्र किल्ली सापडली आणि बाकीच्या सर्व चाव्यांना वेगवेगळ्या जागेवर स्थानाबद्ध करण्याचा निर्णय घेतला.

किल्ली आणि विश्वासार्हता याच अतुट नात आहे.

सहा महिन्यापूर्वीची गोष्ट. गाडी आणि ड्रायव्हर आणि मैत्रिणी असे आम्ही तिघे पालघरच्या नवीन फ्लॅटवर सामान ठेवायला म्हणून गेलो. दोन बॅगा वर ठेवायच्या आणि सगळ्या बॅगा घेऊन पुन्हा गावच्या घरी वरोरला चिंचणी जवळ न्यायच्या अस ठरल. ड्रायव्हर गाडीची किल्ली आणि दोन बॅगा वर ठेवून आला आता निघायचं. ड्रायवर घाबरून कारच्या भोवती भोवती फे-या मारत होता मला कळेना हा असा का फिरतो? तो नवीन बदलीचा ड्रायवर म्हणून मी विचारल नाही, शेवटी गाडीत बसायच्या वेळी तो म्हणाला, मैडम अपनी गाड़ी की चावी शायद गाडी के अंदर गिर गई. मी म्हटल गाडी बंद असताना गाडीत कशी पडेल? सर्व तर्कविर्तक लढवून झाले. शेवटी चावीवाल्याला एका स्थानिक गॅरेज वाल्याने बोलावून आणले. त्याने त्याचं कौशल्य वापरून खिडकीला स्क्रूड्रायव्हर लावून खिडकी उघडली. त्याला म्हटल देखो, कहा है चावी? तो काळासावळा ड्रायव्हर गोरामोरा झाला तरीही चावी कुठे ही सापडेन म्हणतो डिकी मे होगा. अरे ठिक से बताओ कहा रखा है? त्याला आठवेना मैत्रिण कंटाळली मी थकले. आता काय कराव ?

माझं लक्ष सहज खाली असलेल्या बॅगेकडे गेल. मागच्या उघड्या चेनमध्ये ही गाडीची चावी आरामात बसली होती. ती बॅग चुकून तो घेऊन चालला असता हातातल्या बोटाची चावी त्या कप्प्यात गेली असावी असा मी तर्क लढ्वून विषय संपवला. त्याच्या मालकाला फोन करून त्याचा प्रताप सांगितला. त्याचा मालक म्हणाला त्याचे पैसे कापून घ्या. मी पैसे न कमी करता त्यांचे पूर्ण पैसे दिले. समज देऊन गाडीसह पालघरहून ठाण्याला पाठवून दिला.असा हा किल्लीचा महिमा.

# वेषभूषा आणि स्वत:चा कम्फर्ट

कम्फर्ट म्हणजे आरामदायक. मऊ आणि सूती कपडे आरामदायी वाटतात.

आपण कसे कपडे घालवेत हे आपल्या मनावर जरी असलं तरी बरीच बंधन असतात. आपल्यावर झालेले संस्कार, समाज, आजूबाजूचे वातावरण, आपला पैसा या सर्व गोष्टींवर आपली वेषभूषा अवलंबून असते. उदा० आफिसला जायचे असेल तर टापटीप, स्वच्छ पण किरकोळ वेषभूषा करावी लागते.

घरातले, सेमारचे, आजुबाजूचे लोक काय म्हणतील म्हणून काही लोक तेच तेच कपडे वेशभूषा करताना दिसत होते पण आता जागतिकीकरणामुळे स्त्री व पुरुष याच्या पेहरावात बराच फरक पडला आहे. आधुनिक पद्धतीचे व चांगल्या प्रतीच्या किंमतीचे कपडे आजकाल पसंत केले जातात त्यात आकर्षक रंग, लेटेस्ट फॅशन फिटिंग आणि लूक याकडे जास्त लक्ष दिले जाते.

मूड छान राहण्यासाठी मनावरच मळभ दूर होण्यासाठी.

वेशभूषा वय, शरीरयष्टी, रंगछटा न पाहता आपला स्वत: चा कम्फर्ट जपावा. आणि आता ब-यापैकी स्त्रीया तर कोणत्याही वयात ब-याच जणी वेगवेगळ्या वेशभूषा करून बाहेर पडताना दिसतात.

अजून प्रमाण कमी आहे. स्वच्छ, टापटीप आणि नीटनेटके कपडे शोभा देतात. वेशभूषा आकर्षक आणि सुंदर असण्यापेक्षा कम्फर्टकडे जास्त लक्ष दिले जाते. सुटसुटीत, अंगाला न टोचणारे, स्क्रिन फ्रेंडली कपडे वापरले जातात.फॅशन तर सगळ्यांनाच आवडते. पण सगळ्यांनाच फॅशन परवडत नाही. तरीही आपल्या वॉर्डरोबमध्ये असलेल्या कपड्यांचे मिक्स अँड मॅच करुन रंगसंगती बदलून दागिने

व कपडे यांचा योग्य मेळ घातला तरीही आपल्याला नीटनेटके व रुबाबदार व्यक्तिमत्त्व बनवता येते.

देशा तसा वेष अशी म्हण आहे. म्हणजे त्या त्या ठिकणची भौगोलिक परिस्थिती, तापमान, हवा, पाऊस, अव्वल याचा विचार करुन कपडे परिधान केले जातात. घातलेले कपडे सुखावह वाटणे अधिक महत्त्वाचे आहे. कपड्याचा पोत पाहताक्षणी समजला पाहिजे.

रंगछटा बदलूनही वेशभूषा सुंदर करुन व्यक्तिमत्त्वात भर घालता येते.

स्वच्छ, सुंदर नीटनेटके कपडे घालूनसुद्धा कोणतीही व्यक्ती सुंदर आणि रुबाबदार दिसू लागते. अगदी नवीन कोरे कपडे हवेत अस नाही. तर अंगाला छान बसणारे, सुटसुटीत, वावरायला सोयीचे आणि सुंदर दिसणारे कपडे आपला स्वतःच्या आत्मविश्वास द्विगुणीत होतो. आपला व इतरांवर आपल्या कामावर प्रभाव पडतो ते काम चांगले होते व आपण यशस्वी होतो. वेशभूषेमूळे आपल्या प्रयत्नांना जोड मिळते. काम करायल प्रसन्न वाटते. आपण आनंदी राहतो. आपल्या सान्निध्यात येणा-या प्रत्येक व्यक्तीला आनंदी करू शकतो. सकारात्मकता आपल्या देहबोलीतून दिसू लागते.अवघड विषय सोपा करून सांगण्यासाठी, एखाद्या विषयाचे ज्ञान देण्यासाठी,भाषण, व्याख्यान यासाठी वेशभूषा

नेहमीच चांगली रुबाबदारअसावी लागते.

उत्तम सोयीस्कर वेशभूषा हा आपला स्वतःच्या कम्फर्ट झोन असतो.

वेगवेगळ्या रंगछटा, नक्षी, रंगसंगती यांचा मेळ घालून समूहातील लोकांनाही असाच पोशाख़ असेल तर समानतेची भावना निर्माण होते.

शाळेत, कार्यालयात, ज्वेलर्सच्या दुकानात सलोन, आयटी कंपन्या, प्रसार माध्यम अशा ठिकाणी अलीकडे वेशभूषा समान एक रंगी करण्याकडे कल वाढला आहे त्यामुळे समता, बंधुता आणि प्रेमाची भावना निर्माण होते. तसंच काम करायला सर्वांनाचा सोयीस्कर वाटते.

वेशभूषा ही माणसाची ओळख असते. विशिष्ट वेशभूषेमुळे शिक्षण, कामाचे स्वरूप, संस्कृती याची ओळख पटते. बाह्यरूप आकर्षक असेल तर समोरच्या माणसावर प्रभाव पडतो. उत्पादन विक्री करायची असेल, जाहिरात द्यायची असेल किंवा असंख्य लोकापर्यंत पोहचायचे असेल तर वेशभूषा उपकारक ठरते. टोचणारे कपडे माणसाला अस्वस्थ करतात. कामात व्यत्यय येतो. चागल्या सुटसुटीत कपड्यात माणूस कम्फर्ट राहतो व कामाचा आनंद घेता येतो.

# माझी बोली माझी कथा

माय मराठीला समृध्द करणाऱ्या अनेक बोलीभाषा आपल्या देशात आणि राज्यात असतात.

भाषा ही संस्कृतीचा आत्मा आहे. एखादी भाषा मरण म्हणजे संस्कृतीचे मरण हे मानव जातीच कधीही न भरून निघणार फार मोठं नुकसान आहे. जागतिकीकरणाच्या लाटेत संस्कृतीचा विचार करणाऱ्यांना गृहीत धरता कामा नये. तो आपल्या केवळ अस्मितेचा नव्हे तर अस्तित्त्वाचा प्रश्न म्हणून गांभिर्याने बघायला हवे. आपण जागरुक राहिलो तर नव्या लाटेत निश्चितपणे टिकून राहू. स्वतंत्रपणे वाढ समृध्द होऊ. देशाच्या तथाकथित राजकीय सीमा ओलांडून जाणार तंत्रज्ञान आज आपल्या हाती आल आहे. त्याचा योग्य उपयोग करुन सद्सद् विवेक बुध्दीचा वापर केला तर आपल्या भाषेला जागतिक स्तरावर नेणं सोपं आहे.

सर्व भाषा आपल्या आहेत. आपण त्या शिकाव्या गरजेनुसार त्याचा वापर करावा. आपलं जीवन समृद्ध कराव. हे सगळ करताना आपली भाषा आपली संस्कृती सोडण्याची गरज नसते हे आपल्याला

भाषाच्या अभ्यासामुळे कळतं, आपल्यात दडलेला ‘अतिरेकी' संपतो.

संस्कृतीचा ठेवा मुख्यतः भाषेच्या आधाराने टिकून असतो. म्हणूनच संस्कृतीच्या संवर्धनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

व्यक्त होते ती व्यक्ती व्यक्त होण्यासाठी भाषेची गरज असते. या शब्दांना भावनेचा आधार मिळाल्यास व्यक्तिच व्यक्त होण अधिक प्रभावी ठरते.

माणसाला प्राण्यापासून वेगळ्या करणा-या दोन गोष्टी म्हणजे विचार करण्याची क्षमता आणि भाषा यावरून भाषेचे विशेष महत्व समजते.

आपल्या महाराष्ट्र राज्यात अनेक बोली भाषा बोलल्या जातात. मुख्य बोली ६५ असून उपबोली मिळून सुमारे शंभर बोली भाषा आहेत. ज्या आज नामशेष होत चालल्या आहेत.यासाठी बोलीभाषेचे जतन आणि संवर्धन व्हावे यासठी शाळा, समाज, प्रसारमाध्यम, साहित्य इ. मध्ये बोलीभाषेचा अंतर्भाव व्हायला हवा.

माणसामाणसात त्याची लकब, लय, आरोह, अवरोह, हेल निश्चित होते. वीस कोसावर बदलणारी बोली ही भौगोलिक परिस्थितीनुसार तसेच माणसाच्या मानसिकतेनुसार बदलते. त्याचे दैनंदिन जीवन

कामधंदा व्यवसाय यावरही ठरत असत आणि ती बोलीच्या रुपात अवतरते.

कोणत्याही भाषेचे आद्यकर्तव्य बोलणे हे आहे त्यानंतर ऐकणे, वाचणे, लिहिणे असे चार टप्पे असून त्याचा त्याचा पुढचा टप्पा म्हणजे त्या भाषेचा प्रत्यक्ष वापर.

भाषा ही भाषा असते. ती कधीच ग्रामीण नसते. कारण तिच्या अभिव्यक्ती तिच्या मातीतून जन्माला येते. मूळ भाषा आणि बोली भाषा याचं कधी भांडण नसत. भाषा, परंपरा आणि नवीनता यापलिकडे एक अत्यंत गतिमान अवस्था आहे ती म्हणजे नागरीकरण.आजची नवी पिढी मिश्रभाषा बोलताना दिसते. याला जबाबदार कोण? आपण की जागतिकीकरण. कारण बोलीभाषेतला ओलावा संपत चालला आहे. सर्वत्र रुक्षपणा दिसते आहे. कळतं पण वळत नाही अशी अवस्था आताच्या पिढीची आहे. ही सांस्कृतिक एकात्मता रुजवण्याचं काम लोककला करीत आहे.

लोककलेत सगळ्या कला येतात. ओव्या, अभंग, भारुड याद्वारे ते कलांचा अविष्कार करतात. त्याचप्रमाणे बोलीभाषेचाही वापर करुन भाषांचे संवर्धन करतात.

या भाषांवरचे अत्याचार थांबवायचे असतील तर बोली भाषा आपण बोललं पाहिजे. तिचा थोडातरी वापर करायला पाहिजे.

आपल्या मराठीलील बोली भाषावंर अनेक मूळ भाषाचा प्रभाव आहे.

# जागातिक कलादिन

कोणतीही कौशल्यपूर्ण गोष्ट म्हणजे कला.

विशिष्ट पद्धतीची पेयं तयार करणं, धातू वेगळा करणे, वृक्षारोपाची निर्मिती, पट्टीकानेत्र बोल वैनाखळी विद्यादान (एकीकेट्स) व्यायामाचे शास्त्रोवत ज्ञान दुस-यावर बोलणे चालुचाने विजय मिळवणे, पक्ष्यांची भाषा समजणे. चित्र काढणे, चित्र रंगवणे, अशा ६३ कला या जगात आहेत. प्रत्येक कलेचे वेगळे महत्त्व आहे.

‘मानसीचा चित्रकार तो

तुझे निरंतर चित्र काढतो.

चित्र काढतो" कागदावर, कॅनव्हासवर चित्र काढणे त्याचप्रमाणे प्रथमदर्शी आपण माणसाचे ‘चित्र मनात ठरवतो.

समर्थ रामदास म्हणतात.
धन्य ते गायनी कला
धन्य ते गायनी कळा
गाणं म्हणताना परमेश्वर भक्तीची कला
अभिधान छंदारेशान
वास्तुविद्या
लहान मुलांचे मनोरंजन करणे
माणसामाणसांशी प्रेमाने संवाद साधणे
स्वयंपाक करणं ही सुद्धा कलाका
पुस्तक वाचणं
आकर्षक क्रीज

दुसऱ्याला आक
कुरूप व्यक्तीला लावण्यवती बनवणे
हस्त कौरा त्याने कोणतीही कामे.
शब्दाच्च्या कोटया करणे, अंताक्षराची योग्यता ठेवण
शांतपणे ऐकणे, हजरजबाबीपणे, संगीत कल सुविचार संग्रह, लेखन कला

शिल्पकला - छिन्नी हातोडा घेऊन दगडाताला नकोअसलेला भाम काढून टाकला कि सुंदर मूर्ती तयार होते. छिन्नी हातोड्याचे घाव सहन करण्याची शक्ती कला आपल्याला देते. मनावरचे मळभ व त्यावरचे घर कमी करते . वस्त्रप्रावरणाची निवड, लेप तयार करणे, अत्तर बनवणे, स्मरणाशक्ती विकसित करणे अशा कला आहेत. कलेशिवाय माणूस म्हणजे पुच्छाईन माकड असं म्हणतात.प्रत्येक माणूस कलावंत आहे.

वस्त्रगोपन, मणी विणणे, भविष्य सांगणे, गजरा वेण्या विनणे, रत्न पारखणे, झुंजी लावणे, कपाळावरचा च तिलक लावण्याचे साचे बनवणे, त्या त्या काळातल्या गरजेची पूर्तता करताना काही कलांची निर्मिती झाली.

वृक्षारोपणे, स्वयंपाक, गाड्या चालवणे, एकपात्रीप्रयोग, अभिनय नाट्यकला ही सुद्धा फार मोठी कला आहे.

मुकुट बनवणे, केशरचना, नृत्यज्ञान, तांदूळ आणि फुलांची रांगोळी, मसाज करणे, नेपथ्य योग, जलविहार करणे, मंचक तयार करणे, नाट्यअभिनय, काया रंगवणे,

आपल्यातील हटके कलेला योग्य वळण व सरावाने निश्चित आकार दिला तर प्रत्येक माणूस उत्कृष्ट कलावंत बनू शकतो. त्यावर तो आपण करियर करून उदरनिर्वाहाच साधनही बनवू शकतो.

# कंटाळा

आपण माणसे आहेत. देवाने आपल्याला रसिक बनवल आहे. आपण काही यंत्र नाही. कधी कधी काही गोष्टींचा कंटाळा येतो. त्यावर उपाय काय ?

मी हजार चितानी

हे डोक खाजवतो

तो कट्ट्यावर बसतो

शिळ वाजवतो

कंटाळा आला कि माणूस झोपतो आणि फ्रेश होतो. नुसती वामकुक्षी घेतली तस ताजतवानं

झोप जास्त होता कामा नये त्यामुळे आळस वाढेल त्यापेक्षा एखादा छान उडत्या गाण्यावर नाचाव बागडाव मुलांनी आणि तरुणानी

एका ठिकाणी बसूनही कंटाळा येतो. थोडावेळ निसर्गाच्या परिसरात पाय मोकळे करून यावं. त्यामुळे मन प्रसन्न होते आणि कंटाळा निघून जातो.

आपल्या आवडीचा पदार्थ खाण. एखादं फळ, पदार्थ चहा किंवा कॉफी

कामात बदल म्हणजे विश्रांती यामुळे कंटाळाही जाऊ शकतो.

शारीरिक हालचालीचे खेळ, चालायला जाणे इ. चा वापर करुन कंटाळा घालवून स्वतःला रिफ्रेश करु शकता.

आपले छंद जोपासले, चित्रकला, गाणे, एखाद वाद्य वाजवण या गोष्टी केल्या तर छंदामधून वेगळी उर्जा करते आणि रोजचं काम करायला छान वाटते.

लहान मुलांबरोबर त्यांच्यात एक होऊन बागडावे, खेळावे रमावे. त्यामुळे आपला कंटाळा जाऊन आपण आपल्या कामासाठी तयार होतो.

मुके प्राणी, पाळीव प्राणी, फिश टँक, कुत्रा, मांजर, ससा, कासव याकडे पाहत राहावं.

निसर्गाच्या सान्निध्यात गेल्यावरही लहरीमुळे मनाची प्रसन्नता वाढते.झाडावर असलेला पक्षी किडे, यांच्याकडे पाहूनही आपल्याला आत्मपरिक्षण करता येते. त्यामुळे आपला दृष्टिकोन सकारात्मक करता येतो.

अनेक वस्तू विकत घेण्याची इच्छा असते. ती आपली बकेट लिस्ट एका डायरीत लिहून ठेवू शकतो. सतत आपल ध्येय डोळयासमोर राहील व आपण जास्त प्रयत्नशील राहू व कंटाळा येणार नाही.

ते प्रयत्नच आपल्या आयुष्यात रंग भरणार असतात.

तेच तेच काम करून कंटाळा येतो. कंटाळा या शब्दाचे अनेक समानार्थी शब्द आहेत. उदासिनता, वीट उबग, आळस, सुस्ती, थकवा इ.

कधी कधी सगळ्याचाच कंटाळा येतो तर कधी दिवसा रात्र लिहित बसाव असे वाटत असते.

कंटाळा येण्याची कारणं अनेक असतात काही शारिरीक तर काही मानसिक काही अकल्पिक तर काही काल्पनिक काही वास्तव तर काही कृत्रिम

पण आपल्या मनाने जर ठरवल तर माणूस काहीही करु शकतो. सतत उद्योगी राहू न काम तर होतातच पण कंटाळा ही येत नाही. मन थकले कि कंटाळा येतो, कोणत्याही प्रकारचा थकवा मारकच ठरतो.

# लहानपण देगा देवा

‘करी मनोरंजन जो मुलांचे,

जडेल नाते प्रभूशी तयाचे

प्रभूशी नाते जुळलेले असते आपले’

(खरच मुंगी होऊन साखर खाल्लेली चांगली हत्ती होऊन ओडके ओढण्यापेक्षा असं आई नेहमी म्हणायची त्याचा अर्थ मोठे झाल्यावर कळतो)

लहानपण हे गोंडस निरागस बाळाप्रमाणे बागडत असते. लहान असताना घरातील आई वडील किंवा आजी आई बोलत असताना "तू काय ऐकतेस चला जा बाहेर मोठ्यांच्या गप्पा ऐकू नये. मग वाटायच कधी आपण मोठे होतो. पण माझ्या आधी दोन मोठ्या बहिणी असल्यामुळे माझं लहानपणी स्थान हे तिसरच. दिसायला खूप सुंदर म्हणून लहान असेल तरी कुणाकडे जायचं नाही खेळायला. मग आपण नक्की लहान की मोठे?

आमचं पालघर जिल्ह्यातील बोईसरजवळचं छोटसं गाव.गाव लहानसं पण वडील फार मोठे उद्योजक,मोठ खानदान मोठा दुकानाचा व्यवसाय. घरात कडक शिस्त. समोर काकांचे व आजीचं घर.

समोर झोपाळा मोठा.

संध्याकाळी शाळेतून आल्यावर आम्ही वाडीत जात'असू. वाडीत केळी, आंबे, चिंचा फळ फुले भाज्या, पालेभाज्या शहाळी इ. आंबे काढायला गडी. भाजीपाला घरी आला कि घरची बाई भाज्यांच्या जुडया बांधायच्या. तिच्या कडे विक्री करायला गावात येत, कधी दुकानात पण भाज्या विकायच्या-विटीदांडू,

लपाछपी, लंगडी खेळून घरी यायचं हातपाय धूवून तुळशीजवळ संध्यां परवचा, पाढे रात्री वडील अध्याय वाचून दाखवायचे. कधी कधी दुकानातली चिल्लर मोजायल लागे. सकाळी उठून अभ्यास करायचा व मग शाळेत. घरी यायला उशीर लागत असे. घराचे बांधकाम वर्षभर सुरु असायचे त्यामुळे रेतीच्या ढिगावर उन्हाळयात बसून लहान भावंडाना भरवायला लागायच, जिथे सगळी चुलत भावंड व इतर

गावातली मुले मुली यायची. आम्हाला बाहेर जायची बंदी

वाडीतली करवंद खाताना कोंबडा कि कोंबडी हा खेळ नंतर पाच तीन दोन च्या हातावर टाळया देऊन खेळ ख़ेळायच लगेच भांडण व्हायच. घरात वडील पहाटे उठुन व्यायाम करायचे आंघोळ व देवपूजा सर्व मंत्र स्तोत्र मुखोदेखत मोठ्याने सारा गाव जागा होई. आमच दुकान उघडल्याशिवाय कोणाच्याच घरी चहा होत नसे . वडील निर्व्यसनी चहाही घेत नसत. घरच्या गाई म्हशीच चहासाठी दूध घेत . दुधदुभत भरपूर आम्ही सर्व चहा पित. खोट बोलायच नाही देव पाप करतो अस वडील सांगायचे. वडीलांशी बोलायची हिंमत नसायची. कडक स्वभाव शिस्त व व्यवहारी. त्यामुळे लहानपणी आम्ही बोलत नसू. आईला सांगायच मग आई वडिलांना सांगायची व वडिल भुताच्या गोष्टी सांगायचे. भुतांचे प्रकार व कथा सांगायचे. पुढे त्यांनी तीन पुस्तक लिहिली. त्यात एक पुस्तक भूताचं होतं. त्यामुळे भूताची भिती वाटायची. रात्री बाहेर पाठवायचं नसल कि जाऊ नको तिकडे भूत आहेत. मग आम्ही घाबरत असू.

घरची श्रीमंत असून फाजील लाड केले नाही. 'वाडीतली हिरवी मिरची भायखळयाला पाठवायचे. त्याचे पैसे आले कि आम्हा मुलांना त्याचे कपडे शिवायचे. लहानपणापासून घरी कामाला बाई, दुकानात व वाडीत काम करायला

नोकर चाकर पण पैशाला हात लावायचा नाही. पैशामुळे मुलं बिघडतात वडील असं म्हणायचे त्यामुळे आर्थिक शिस्त लागायची.

शनिवारी आई वडिलांचा उपवास असायचा रात्री ही जेवत नसत. तेव्हा मी काहीतरी पदार्थ करी कधीतरी सहा महिन्यानी हे वनभोजन करीत असू सर्व मुलं मुलं शिजवून जेवत असू खूप मजा. होळीला गाणी म्हणायला जायचो मुल व घरोघरी मिळालेल्या पैशाने मैत्रिणिची आई बटाटेवडे बनवून खायचो.

पहाटे उठून वडील रोडिओवर मंगलप्रभात कार्यक्रम लावायचे कामगार सभा वनितामंडळ. अहो प्रपंच अशी श्रुतिका लागायची ते कार्यक्रम ऐकून गाण्याची आवड व ज्ञानात भर पडायची.गावात फक्त आमच्याकडेच रेडियो व टिव्ही सुद्धा पहिला आमच्याकडे आला. गावातल्या मुलांना दुकानवाल्यांकडे टिव्ही बघायला जायचे ठरलेलेच कार्यक्रम त्यामुळे दूरदर्शनच्या बातम्या संपल्या की अभ्यास करून झोपयचं सार्वजनिक गणपती उत्सवास वडील नक्कल करायचे वाडीतले आंबे भरपूर खायला मिळायचे. सफेद जाम चिकू, केळी आणि शहाळी बैलगाडीतून आणन. आम्ही हायस्कूलला असताना वडिलांनी टेम्पो घेतला पण बैलगाडीत बसून जाण्याची मजा काही औरच होती.

गावातले मातीचे रस्ते आता सीमेंट क्रॉन्किटचे झाले चूल जाऊन घरोघरी गॅस आला . ८०% कौलारु असलेली घरे बिल्डिंग झाली. दारासमोर चारचाकी. आता तेव्हासारखी मजा येत नाही.

गाव आणि शहर यात तितकासा फरक उरला नाही.

म्हणून वाटते - ‘लहानपण देगा देवा

मुंगी साखरेचा खवा’

# प्रार्थना

प्रार्थना भक्ति की शक्ती

“हिच आमुची प्रार्थना अन्
हेच अमुचे मागणे
माणसाने माणसाशी
माणसासम वागणे”

या प्रार्थनेत संपूर्ण जीवनाच सार सांगितल आहे. प्रार्थना हा प्रत्येक जीवाचा सहज स्वभाव आहे. प्रार्थना हा मानवाचा प्राण आहे. प्रार्थनेशिवाय मनुष्य म्हणजे मृत व्यक्तीच होय.

प्रार्थना म्हणजे मानवाने स्वतःच्या ताकदीच्या मर्यादा ओळखून व परमात्म्याचे अनंत, अपार व अमर्याद सामर्थ्य आणून स्वतःच्या सामर्थ्यासाठी त्या परमेश्वराला अत्यंत प्रेमाने केलेले आवाहन होय.

परमेश्वराशी जिव्हाळयाचे नाते निर्माण करून त्याच्याशी पूर्ण विनम्रतेने, आदराने आणि प्रेमाने संवाद साधणे म्हणजे प्रार्थना.

प्रार्थनेत मागणे असते. पण काय मागायचे ते आपल्याला माहित पाहिजे. संत ज्ञानेश्वरांनी चराचरा साठी पसायदान मागितलं.

कोणत्याही कार्याच्या आरंभी प्रार्थना, कार्य करीत असताना, प्रार्थना आणि कार्य पूर्ण झाल्यावर प्रार्थना हेच महन्मंगल यशाचे गमक आहे.

प्रार्थनेमुळे मनाला शक्ती मिळते. मन: सामर्थ्य वाढते. आपल्या प्रत्येक शुभकार्यात आपण त्या शक्तिमान परमेश्वराला निमंत्रित करतो. आपल्या प्रिय व्यक्तींनाही आपण बोलवतो व म्हणतो आमच्या कार्यक्रमाला आपली उपस्थिती प्रार्थनोय आहे. सुखात, दु:खात, प्रेमात सगळीकडे प्रार्थना असतेच.

स्वातंत्र्यवीरांनी देशासाठी प्रार्थना केली. म. गांधीनी प्रार्थना हे जीवनाच अविभाज्य अंग मानल. साधू,संत, कवी, लेखक, सर्व वेद पुराण यात ही प्रार्थना आहे. प्रत्येक ग्रंथांच्या आरंभी प्रार्थना व नमस्कार करुनच ग्रंथनिर्मिताला आरंभ करतात वास्तू बांधायला, नवीन वस्तू वापरायला सुरुवात करताना प्रार्थनेबरोबर श्रीफळ वाढवतात. आपण सकाळी उठल्याबरोबर हाताचा पसा समोर धरून

"कराग्रेवसते लक्ष्मी करमध्ये सरस्वती, करमूले तू गोविंदा प्रभाते करदर्शनं" अशी प्रार्थना म्हणून देवची प्रार्थनाच करतो.

हमको मन की शक्ति, देना मन विजय करें

दूसरों की जय से पहले खुद की जय करें

तू बुद्धी दे तू तेज दे , जे जे उत्तम उदांत आहे ते सर्व प्रार्थनेत आहे.

आपल्या स्वत:तील दुर्गुणांवर विजय मिळवणे स्वतःच्या जीवनाची सर्व दृष्टीनी उन्नती करून स्वतःचा विकास करतात. प्रार्थना आपल्याला शक्ती देते. शक्ती मिळण्यासाठी प्रार्थनाच उपयोगी पडते. प्रार्थना हे जिवंत मनाचे लक्षण आहे. जसं आपल्याला जगण्यासाठी समतोल आहार घ्यावा लागलो तसचं प्रार्थना ही अंतःकरणांचा आहार आहे.

जिथे प्रार्थनांची आवश्यकता वाटत नाही तिथे अहंकार, अतिरेक व रुक्षता दिसून येते. प्रार्थनेनेच शक्ती भक्ति शांती व एकाग्रता मिळते.

श्रध्देने म्ह्टलेली प्रार्थनाच त्या शक्तीशाली चैतन्या कडे आपल्या मनाला घेऊन जाते. त्यामुळे मन प्रसन्न होते. प्रसन्न मनात चांगले विचार येतात व घेतलेल्या कामात लवकर यश मिळते. अशी माझी दृढ श्रद्धा आहे.

प्रार्थना ही भक्तीरुपी शक्ती आहे. भक्ति व शक्ति मधील प्रार्थना हा सेतू आहे. काहीतरी मागण्यासाठी केलेली प्रार्थना, व्रत निष्काम मनाने देवा फक्त तूच हवास ह्या एकमेव प्रेरणेने केलेली परमात्म्याची प्रार्थना म्हणजे आनंदपूर्ण जीवनाचं एकमेव सूत्र आहे.

# परिवर्तन

जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळालं नव्हते तेव्हा आपल्या देशावर परकियांच्या स्वा-या होत होत्या. त्यामुळे स्त्रीची संरक्षणाची जबाबदारी साहजिकच पुरुषांवर होती. त्यामुळे पुरुषाने आपल्या स्त्रीला घरात ठेवल ती घरीच राहू लागली. चूल आणि मूल हेच तिच कार्यक्षेत्र. स्त्री घरातली जबाबदारी घेऊ लागली. त्यामुळे पुरुष उदरनिर्वाहासाठी बाहेर जाऊ लागला. तेव्हापासून स्त्री म्हणजे परक्याचं धन, काचेचं भांड,अशी भावना समाजात निर्माण झाली. पुरुषसत्तेचं कोंदण स्त्रीने स्विकारल• माझ्या बाबाना हे आवडत नाही, आमच्या हयाना उशीरा घरी आलेले आवडत नाही. ७ च्या आत घरात ये. अशी आशयाची वर्णन ऐकायला मिळाली.

लहानपणी मुलं खेळ खेळतात. तेव्हा मुलगा बॅट बॉल घेऊन खेळायला जातो व मुलगी भातुकली खेळते. ती खोटा खोटा स्वयंपाक करते. बाहेर गेलेला मुलगा घरी येतो व त्याला ती मुलगी वाढते. हेच संस्कार त्या बालमनावर कळत नकळत रुजवले जातात. त्यातून पुरुषप्रधान संस्कृती जन्माला येते.व आजही आहे.

१६व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत स्त्री ही पुरुषप्रधान संस्कृतीला बळी पडली होती पण १९ व्या शतकानंतर आजच्या २१व्या शतकात स्त्री व्यक्त होताना दिसते. तरीही १००% स्त्री स्वतंत्र पणे लेखनच काय आपल्या पगारातल्या पैशाचं व्यवस्थापन ही करू शकत नाही. कारण ते पुरुषांना आवडत नाही. मग कुटुंबात मानसिक क्लेश निर्माण होतो. मनं दुरावतात. व स्त्री एकटी पडले मग कसली येणार प्रतिभा म्हणून ती स्वतःला बदलते व पुरुषी वर्चस्व मान्य करते.

पण काही बडखोर लेखिकांनी, पुरुषप्रधान संस्कृतीवर ताशेरे ओढले, व स्वतः स्वतंत्रपणे लिहू लागल्या त्यामुळे सर्वसामान्य स्रियांना आधार वाटू लागला. ललित, काव्य, प्रवासवर्णन,कथा, कादंब-या, नाटके, विनोदी लेखन, समीक्षा त्या करू लागल्या. तरीही पुरुषाच्या तुलनेत कमीच.

'बाबांचा संसार माझा कसा होणार'' अशी कांदबरी लिहिणाऱ्या जेष्ठ कुमारिका स्वत:चे नाव विभावरी शिरूरकर या नावाने लेखन केल. हे लेखन स्वातंत्र्याचे पहिले पाऊलच होय.

गौरी देशपांड, आशा बगे, सानिया यांही लेखिका स्त्रीवादी मते मांडतात.

पण याचा अर्थ असा नव्हे कि सर्वच पुरुष स्त्रियांना कमी लेखतात किंवा स्त्री लेखनाला विरोध करतात.

नुकताच पाहिलेला आनंदी गोपाळ या चित्रपटात, गोपाळराव जोशी, आपल्या पत्नीला डॉक्टर बनवण्याचं तिचं स्वप्न पूर्ण करतात सर्व शक्ती, युक्ती पणाला लावून.

स्त्री व पुरुष ही या संसाराची दोन चाक. आज स्त्री शिकली. सुसंस्कृत झाली त्यामुळे पुरुषाची त्या स्त्रीची स्वतःची व संपूर्ण कुटुंबाची प्रगती झाली.

आज ही अनेक पुरुष स्त्रियांना प्रोत्साहन देतात. आपल्या घरातल्या प्रत्येक स्त्रीवर मग ती आई, भगिनी, पत्नी, कन्या कुणीही असेल. तिच्यावर प्रेम करतात. त्यामागची भावना म्हणजे तिच्या संरक्षणाची जबाबदारी हिच असते. मालकीहक्क सर्वच पुरुष गाजवत नाही तेव्हा स्त्रियांनी आपला आत्मसन्मान जपून पुरुषाच्या खांदयाला खांदा लावून त्याला विश्वासात घेऊन आपली साहित्यसंपदा पुढे चालू ठेवावी व तो वारसा पुढच्या पिढीला द्यावा असं मला वाटत.

डॉ. आंबेडकर, म. फुले, गोपाळ जोशी, महर्षि कर्वे, म गांधी कितीतरी महान विभूतींनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला आजही अज्ञात पुरुष घराघरात स्त्रियांनी पुढे व्हाव आपल्या कार्यात यशस्वी व्हाव म्हणून कष्ट घेतात. तेव्हा केवळ पुरुषप्रधान संस्कृतीचाच लेखनावर प्रभाव आहे अस १००% म्हणता येणार नाही सर्व बाजूंनी परिवर्तन झालेलं आहे.

# १ हा अंक आपल्या सर्वांना आवडतो

कोणत्याही गोष्टीची सुरुवात एक या अंकाने होते. एक होता राजा एक होती राणी एक अंकावरून वस्तू मोजतात, एक शब्द किंवा अंकावरून सुरुवात करतात. गाण्यात पहिला नंबर १ वरून ओळखला जातो. १ नंबरच्या बक्षिसाला खूप महत्व आहे.

एका तळ्यात होती. एक या अंकाशी किंवा एक या शब्दाशी निगडीत असलेली गाणी आपण ऐकतो.

१ तारखेला पगार होतो. आपण ठरवतो १ तारखेपासून खर्च लिहायचा. घरात सगळ्याना विचारल जात.

या पैशाचे काय आणलं.असे काही दिवस जातात. खर्च लिहिला जातो. ५,६ तारखेपर्यंत फार तर आठ दिवस. पुढचे काही आठवत नाही. मग आपण काय म्हणतो जाऊ दे. पुढच्या महिन्या पासून लिहू. १ तारीखे पासून संकल्प केले जातात. अशी हि किमया एकाची.

एक कोल्हा, बहु भुकेला, फार होता कावला एक तुकडा परि न त्याला खावयासी गावला

जेव्हा आपण एखादयाला बक्षीस देतो, तेव्हा ५१, २१, १०१, ५००१ असे देतो. १ रुला महत्त्व आहे. बालकवीचं पुढच गाण एक आकडयाचे एक शब्दाचे महत्व पटवून देणार आहे. शाळेत पहिला नंबर येतो. स्पर्धेत १ ल्या नंबरला महत्त्व.

माझे गाणे एकच माझे नित्याचे गाणे, माझे गाणे

एक शब्दाचे महत्व - एक सांगायचय, एक चित्रपट आलाय. मुलं पालकांशी बोलत नाही.

पोलीस अधिकारी असलेले एक ग्रुहस्थ आपल्या मुलानी पोलिस अधिकाची व्हावे ही अपेक्षा पण मुलाला ते पटत नाही, शेवटी मुलगा कडक शिस्त व धाकाला घाबरून आत्महत्या करतो. नाटक एक सांगायचय बाबूजीच्या स्वरातील गीत

'एक धागा सुखाचा शंभर धागे दुःखाचे' –

एका ध्येयावर लक्ष केद्रित कराव. माणसाला देवळाच्या रांगेत उभं असताना आपण आपले बूट नेणार तर नाही पण विठ्ठलाच्या दर्शनाला येताना आपण फक्त त्याचाच विचार करायला पाहिजे. पण आपल एक मन सगळीकडे फिरून आलेल असत. त्या एका परमेश्वरांशी आपली ब्रम्हानंदी टाळी लागली पाहिजे तो एकच शाश्वत आहे बाकी सर्व नश्वर.

एका विठ्ठलाचाच विचार असलेले हे भक्ती गीत 'तारी एकतारी संगे एकरूप झालो आम्ही विठ्ठलाच्या भजनात न्हालो'

खरोखर त्या विठ्ठलाच्या नामात आपण सगळ रंगुन जातो. – ब्रम्हानंदी टाळी घ्यायला

एक आजचा दिवस. आपल्या जीवनात आनंदाची बरसात आणते. आपल्याला खुप आनंद समाधान मिळो. प्रसन्न दिवसाची सुरुवात होऊन समाधान व सौख्याचा दिवस असो हिच शुभेच्छा. अवघा रंग एक जाला रंगी रंगला श्रीरंग

सर्वसाक्षी एका परमेश्वरांना नमस्कार करून कार्यक्रमाची सांगता येते

एकाच या जन्मी जणू फिरुनी नवी जन्मेन मी

एका जागेवर बसून अभ्यास करावा एका जागेवर बसून जेवावे

एक कप चहा,

एक ग्लास पाणी,

लहान मूल आईकडे आर्जव करत, ए आई मला एकदाच खेळायला सोड, ए आई मला एक लाडू दे.

रागावलेल्या आईशी गट्टी करायला निघालेल मूल आईला म्हणते, ए आई माझ्याशी एकदाच बोल

मला एक झोका घेऊन दे.

श्रीराम प्रभू एक पत्नी, एक वचनी, एकबाणी होते. त्यांचा आदर्श पृथ्वीलोकात भरून उरला आहे.असा हा एक अंकाचा महिमा खूपच महत्त्वाचा आहे.

# पर्यावरणस्नेही

परंपरा आणि परिवर्तन या आधुनिक धावपळीच्या गडबडीच्या काळामध्ये नव्या आणि जुन्याचा कसा समन्वय साधावा.

आपल्या हिंदू धर्मात वर्षभर सण आणि उत्सव यांची रेलचेल सुरूच असते. त्यामुळे संस्कार आणि संस्कृती टिकते. मानवता धर्म जोपासला जातो. ही यामागची पारंपारिक भूमिका होती.

आता २१ व्या शतकात जग हे तंत्रयुग झाले आहे. प्रत्येक काम यंत्रावर मशीन वर केले जाते. जीवन गतीमान झाल्यामुळे दैनंदिन जीवन व्यस्त झाले आहे. त्यातच हे उत्सव साजरे करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे बऱ्याच नैसर्गिक वस्तूंना दूर सारून काहीवेळा प्लॅस्टिक, थर्माकोल यांचा वापर केला जातो. त्यामुळे कचरा आणि प्रदुषण होते. त्यासाठी प्रबोधन मोठ्या प्रमाणात कराव लागते.

गौरी गणपतीचे उत्सव सुरू असताना हे उत्सव पर्यावरण स्नेही करावा, प्रदूषण व कचरा टाळावा याकडे सर्वांचाच कल आहे. पण काही ठिकाणी सार्वजनिक उत्सव असतात तिथे अनेक व्यक्तीचे विचार व हात असतात, तितकी मत असतात. त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहचते.

गणपती, गौरी, नवरात्र, दिवाळी असे हे सण रांगेत येतच असतात. सण साजरे करून संस्कृती व माणुसकी, प्रेम, समानता ही मूल्ये टिकवून आपल्याला आता सण साजरे करण्याची वेळ आली आहे.

पर्यावरणस्नेही उत्सव म्हणजे आपल्या सभोवलताच्या वातावरणाला हानी पोहोचणार नाही अशा पद्धतीने जगणे होय. जीवनाचा हा मार्ग अधिकाधिक

महत्वाचा होत चालला आहे. कारण आपल्याला संपूर्ण सजीवसृष्टीचे संरक्षण करायचं.आता गणपती आणि गौरीच्या सजावटीमध्ये कमीतकमी उर्जेचा वापर करणे, वनस्पती, पाने फूले याचा वापर तसेच सुंदर रेशमी साड्या, ओढण्या यांचा रंगीबेरंगी कागद याचा वापर करून डेकोरेशन करता येईल. जेणेकरून प्लॅस्टिक न वापरता सजावट सुशोभित होईल.

बॅंड, ढोल, ताशे यांचाही सार्वजनिक उत्सवात वापर कमी किंवा बंद करता येईल. गणपती विसर्जनाच्या वेळी गुलाल न उधळता फक्त देवाच्या मूर्तीवर भक्तिभावाने गुलाबपाकळ्यांनी वर्षाव करून बाप्पाला निरोप देता येईल.

प्रसादही फळांचा करता येईल.

शाडूच्या मूर्ती वापरणे, ध्वनिक्षेपणाचा आवाज कमी ठेवणे, ओला कचरा, सुका कचरा यांची विभागणी, सार्वजानीक वाहनांचा वापर करणे अशा कृती जाणीपूर्वक केल्यास आपल्या उत्सवातून आनंद जास्त निर्माण होईल.

आमच्याकडे गौरीपूजनच्या आधी पाटावर गौरी आवाहन करून एका तांब्यात पाणी व एका तांब्यात तांदूळ भरून ठेवतात.

दुसऱ्या दिवशी सांग्रसंगीत पारंपरिक उकडीचे मोदक आणि भरपूर भाज्या अळुच्या गाठ्या,वरण भात, भाजी असा शुद्ध शाकाहारी नैवेद्य केळीच्या पानावर वाढून आरती केली जाते. संपूर्ण पर्यावरणपूरक असा गौरी उत्सव आमच्याकडे होतो. चला पर्यावरणाचा ऱ्हास टाळू या. पर्यावरण स्नेही बनू या.

# लेखन

लिहिता हाता गाता गळा आणि शिंपता मळा हा थांबता कामा नये.

साहित्य का लिहिले जाते? याची अनेक उत्तरे आणि मते आहेत.

संतकाव्य, पंतकाव्य आणि तंतकाव्य, पंडीत साहित्य शाहिरी काव्य असे साहित्याचे प्रकार आहेत. साहित्याच कारण काहीही असो. हास्यासाठी, विनोद, दु:ख, वेदना निरामय अंर्तमनाचा आवाज इ. कारणासाठी साहित्य लिहिले जाते.

विनोद शस्त्रा सारखे आहे असं म्हणतात. साहित्यातून माणसाचे मनपरिवर्तन होते. आजार बरे होतात, मनाला विरंगुळा मिळतो.

आपल्या लेखणामुळे कुणीही दुःखी होता कामा नये.

विनोद कोणाच्याही शारिरीक व्यंगावर करू नका. लेखनातून आनंदच निर्माण झाला पाहिजे.

‘गावे आनंदाचे गाणे ओठी आनंदाचेच गाणं’

आनंदाच गाण निर्माण झालेल साहित्य निर्माण असल पाहिजे.

रोज रोज विचारांचे पाणी घालावे लागते. दु:खातूनही माणूस जास्त चांगले लिहू शकतो. आशा भोसले यांनी लेखनही केले आणि गाणे सुंदर केले हिच अनुभूती सर्वांना येते.

आपण जेव्हा लिहितो तेव्हा

आपला हात लिहिता ठेवला पाहीजे.

भरलेला माठ पुर्ण भरला की तो झिरपू लागतो अंत:प्रेरणा असते ती.

मला लिहिताना कोणताही दैनंदिन जीवनातील विषय चालतो. हृदय भरून येईल तेव्हा लिहिले जाते चांगल लिहिण्या साठी वाचन केल पाहीजे. वाचनामूळे ज्ञान मिळते आणि माणूसू बहुश्रुत होतो. मन, डोळे वाचता यायला हवे. सूक्ष्मपणे निरिक्षण करायला पाहिजे.

बाबासाहेब आंबेडकर,यांनी वाचाल तर वाचाल?अस म्हटल आहे.

संत तुकाराम, समर्थ रामदास याचे साहित्य.

निसर्गातील उजेड, प्रकाश, अंधार निसर्गाच्या शाळेचा अभ्यास केला पाहिजे. हात लिहिता ठेवण्यासाठी सातत्य हवे.

सकसता आणि संदरता येण्यासाठी वाचन, लेखन, आत्मचिंतन करायला हवे.

ए.पी.जे. कलाम, पं. नेहरू, स्वा. सावरकर यांची आत्मचरित्र, अनेक विषयावरची पुस्तक बाबूजींच आत्मचरित्र जगाच्या पाठीवर गायक म्हणून माहित आहेत पण लेखक म्हणूनही प्रसिद्ध आहेत.

तुकाराम महाराज असं म्हणतात ‘सुख़ पाहता जवाएवढे.

त्या त्या लेखकाची अनुभूती आपल्याला येते अशी पुस्तकं वाचून प्रेरणा मिळते.

काहींना लेखनाची दैवी देणगी असते. तो शब्द न शब्द वाङमय बनतो.

लेखन लगेच टाइप करुन घाई घाईत सोशल मिडियावर प्रसारित करु नये. संगीता प्रमाणे रियाज करावा. कुसुमाग्रजांचे तेज:पुंज साहित्य आहे. त्याची आगळी

वेगळी पृथ्वीचं प्रेमगीत, कणा ही कविता अजरामर आहे. मधु मंगेश कर्णिक माहिमच्या खाडीपासून , त्याच्याकडुन प्रेरणा मिळते.

गुलजार मेरा कुछ सामान तुम्हारे पास पड़ा है। यांच मराठीत भाषांतर नाही होत.

भाषेत भावना आहे. भावनेची भाषा आपल्याला साहित्य शिकवते. कोणतीही माहिती हे साहित्य होत नाही.

साहित्य हे मनाच्या तळापर्यंत, हृदयापर्यंत जाऊन भिडणारं असलं पाहिजे.

चेतन भगत यांच्या कथा रसिकांना आवडतात. आपलं आणि इतराचे मन मोकळ होते वाचक व लेखक यांच्या मनाच नात साहित्य निर्माण करते.

लेखन झऱ्या सारखे वाहत असाव ते थांबले कि त्याचे साचलेपण येत त्याच डबक होऊ नये म्हणून लिहिता हात लिहिता राहावा.

पु.ल. देशपांडे विनोदी लेखक आहेत. आचार्य अत्रे याचा हात कुणीला धरू शकत नाही. आशा बगे - रात्री कधीतरी उठून बसते आणि लिहिते.

कविता ललित बंध, नाटक, एकांकिका लिहू शकतो. सर्वानच सर्व साहित्य प्रकार लिहिता येईल अस नाही. फारसी, संस्कृत इंग्रजी या भाषाची ओळख करून घेतली तर लक्षात येईल कि आपल्या मराठी आलेले आहेत.

चंद्रशेखर गोखले हे आपल्या लेखात नवीन नवीन शब्द वापरत असत.

सुरी मारण्यासाठी, फळ कापण्यासाठी की शस्त्रिक्रयेसाठी वापरावे.तसच साहित्य हे सुद्धा दुधारी शस्त्र आहे ते जपून वापरावे.

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १७ वे वर्ष.**

**डॉ. अंजुषा पाटील यांचे हे पहिले पुस्तक.**

डॉ. अंजुषा पाटील या शिक्षण तज्ज्ञ आहेत. आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ त्यांनी ज्ञानार्जन आणि ज्ञानदानामधे व्यतीत केला. त्यामुळे ज्ञानाचे कण जमा करत रहाणे आणि ते मुक्त हस्ताने त्याचे वाटप करणे हा त्यांच्या आत्मिक स्वभावाचा भाग बनला आहे. हा त्यांचा प्राणवायू आहे.

डॉ. अंजुषा पाटील यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१४), डॉ. नितीन मोरे (५६पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), डॉ. वृषाली जोशी (५३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका

बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१३), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२६), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (७), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (४) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे, सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(२), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(३), कैलास बडगुजर, अंजुषा पाटील असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।


फुले उमलुनी यावी
मन अंजुषा देत जावे
मुक्तहस्ताने घेत जावे
डॉ.अंजुषा अनिल पाटील